सोलापूर **तरुण भारत** Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ११ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३३१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### पंतप्रधानांचा केरळ, तामिळनाडू दौरा

**नवी दिल्ली:** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बुधवार ११ मार्च २०२६ रोजी केरळ आणि तामिळनाडूचा दौरा करणार असून या दौऱ्यात ते हजारो कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण करणार आहेत. दुपारी १.३० वाजता ते एर्नाकुलम येथे पोहोचून सुमारे १० हजार ८०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना चालना देतील. कार्यक्रमादरम्यान ते उपस्थितांना संबोधितही करणार आहेत. एर्नाकुलम येथे पंतप्रधान भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) च्या कोची रिफायनरीमध्ये सुमारे ५,५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत उभारल्या जाणाऱ्या पॉलीप्रोपिलीन युनिटची पायाभरणी करतील.

### गॅसबाबत केंद्राचा निर्णय

**नवी दिल्ली:** पश्चिम आशियामध्ये इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील तणाव आता टोकाला पोहोचला असून, त्याचे पडसाद भारताच्या ऊर्जा क्षेत्रावर उमटू लागले आहेत. या युद्धाचा फटका देशातील गॅस पुरवठ्याला बसू नये आणि सर्वसामान्यांची चूल पेटती राहावी, यासाठी केंद्र सरकारने एक अत्यंत मोठा आणि तातडीचा निर्णय घेतला आहे. सरकारने संपूर्ण देशात नैसर्गिक वायूसाठी 'अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५' लागू केला आहे.आंतरराष्ट्रीय स्तरावर गॅस पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती असल्याने, केंद्र सरकारने गॅस कंपन्यांना कडक निर्देश दिले आहेत. या कायद्यानुसार, आता गॅस पुरवठ्याचे नियंत्रण पूर्णपणे सरकारच्या हातात आले आहे. सरकारने प्राधान्य क्षेत्र ठरवून दिले असून, त्यानुसारच गॅसचे वितरण करावे लागणार आहे. यात प्रामुख्याने घरगुती गॅस ग्राहक, सीएनजी, पीएनजी आणि रुग्णालयांसारख्या अत्यावश्यक सेवांना सर्वाधिक प्राधान्य दिले जाणार आहे.

### मॅरियट आणि स्विगीची भागीदारी

**मुंबई :** मॅरियट इंटरनॅशनलचा पुरस्कारप्राप्त ट्रॅव्हल प्रोग्राम मॅरियट बॉनव्हॉय आणि भारतातील अग्रेसर ऑन-डिमांड प्लॅटफॉर्म स्विगी एकत्र आले आहेत ज्यामुळे आता मॅरियट बॉनव्हॉयचे फायदे भारतीय ग्राहकांना त्यांच्या रोजच्या आयुष्यातही सहज मिळणार आहेत. ही नवी भागीदारी भारतातील हॉटेल क्षेत्रातील विश्वासार्ह ब्रँड मॅरियट बॉनव्हॉय आणि रोजच्या गरजांसाठी लोकप्रिय असलेला स्विगी यांना एकत्र आणते, ज्यामुळे आता दोन्ही ब्रँडचे सदस्य स्विगीवरून फूड डिलिव्हरी, क्विक कॉमर्स किंवा डायनिंग आऊट करताना मॅरियट बॉनव्हॉयचे पॉइंट्स कमवू शकतात, म्हणजेच, प्रवासापुरते मर्यादित असलेले मॅरियट बॉनव्हॉयचे फायदे आता रोजच्या खरेदी-ऑर्डरमध्येही मिळणार आहेत.

### स्वतःच्या अपहरणाचा बनाव

**भंडारा :** एका नामांकित शाळेतील १२ वर्षीय विद्यार्थ्याने केवळ शिक्षक आणि पालकांच्या भीतीने स्वतःच्या अपहरणाचा ड्रामा रचला. हा प्रकार उघडकीस येताच चर्चेला उधाण आले आहे. भंडारा मधील पवनी शहरालगत असलेली आनंदम विद्यामंदिर शाळेत दोन विद्यार्थ्यांमध्ये भांडण झाले. नंतर भांडणाचे रूपांतर हाणामारीत झाले. रागाच्या भरात एका १२ वर्षाच्या विद्यार्थ्याने टेबलवर काहीतरी अभद्र वाक्य लिहिली. शिक्षकांनी ती वाचताच पालकांना बोलवण्याचे फर्मान सोडले. यावर मार्ग काढण्यासाठी विद्यार्थ्याने 'एआय'ला काय करायचे असे विचारले असता 'एआय'ने त्याला चुकीची कबुली देण्यास सांगितले. मात्र आपण चूक कबूल केली तर बाबा मारतील या भीतीने या अल्पवयीन विद्यार्थ्याने दुसरा मार्ग शोधला. त्याने स्वतःच्याच अपहरणाचा बनाव रचला.

### क्रिकेट संघाच्या सत्काराची मागणी

**मुंबई :** भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघाने आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत तिसऱ्यांदा आणि सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावल्याबद्दल मुंबई महानगरपालिकेतर्फे संघाचा भव्य नागरी सत्कार करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना नगरसेवक व महापालिका गटनेते अमेय घोले यांनी केली आहे. यासंदर्भात घोले यांनी १० मार्च २०२६ रोजी महापौरांना पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, भारतीय क्रिकेट संघाने आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद मिळवत इतिहास घडवला आहे. तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावताना सलग दुसऱ्यांदा ही कामगिरी केल्याने देशाचे नाव संपूर्ण जगभरात उंचावले आहे. भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ, जिद्द आणि संघभावनेच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली असून हा क्षण प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# समान नागरी संहिता लागू करण्याची गरज

## मुस्लिम महिलांच्या वारसा हक्कांवर सर्वोच्च न्यायालयाची मोठी टिप्पणी

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :** मुस्लिम महिलांवरील भेदभावाच्या आरोपावरून शरियत कायदा, १९३७ मधील काही तरतुदी रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने (दि.१० ) समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्याची गरज अधोरेखित केली. मात्र, या विषयावर अंतिम निर्णय घेणे हे विधिमंडळाचे काम असल्याचेक्ष न्यायालयाने स्पष्ट केले.



याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयाला विनंती केली की, मुस्लिम महिलांना पुरुषांप्रमाणे समान वारसाहक्क देण्याचा अधिकार घोषित करावा. तसेच शरियत कायदा रद्द झाल्यास भारतीय वारसा कायदा लागू करण्याचा विचार करावा.

यावर सरन्यायाधीश सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले की, शरियत कायदा रद्द केल्यास मुस्लिम वारसाहक्कासंबंधी कोणताही वैधानिक कायदा शिल्लक राहणार नाही आणि त्यामुळे कायदेशीर पोकळी निर्माण होऊ शकते. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सांगितले की, सुधारणांच्या अति घाईत आपण ज्या महिलांच्या हितासाठी प्रयत्न करत आहोत, त्यांनाच सध्यापेक्षा कमी हक्क मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. शरियत कायदा रद्द झाल्यास अनावश्यक कायदेशीर पोकळी निर्माण होईल.

न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनीही या मुद्द्यावर भाष्य करताना सांगितले की, भेदभावाबाबत तुमचा मुद्दा मजबूत आहे; मात्र या विषयावर निर्णय घेणे हे विधिमंडळाच्या अधिकारात येते. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनुसार समान नागरी संहिता लागू करण्याचा अधिकारही विधिमंडळालाच आहे. एकपत्नी-एकपतीचा नियम सर्व समुदायांमध्ये समानरित्या लागू होत नाही. मग सर्व द्विविवाहांना असंवैधानिक ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे या विषयावर विधिमंडळाच्या निर्णयाची वाट पाहणे योग्य ठरेल, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

**यापूर्वीही समान नागरी संहिता लागू करण्याबाबत सूचना**

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही अनेकदा केंद्र सरकारला समान नागरी संहिता लागू करण्याबाबत विचार करण्याची सूचना केली असल्याचेही सुनावणीदरम्यान खंडपीठाकडून यावेळी नमूद करण्यात आले.

# पाकिस्तान भिकेच्या उंबरठ्यावर

## शाळा, महाविद्यालय थेट २ आठवड्यांसाठी बंद

## इंधन संकटामुळे पाकिस्तानचा मोठा निर्णय; सरकारी कार्यालये आठवड्यात फक्त ४ दिवस, तर शाळा दोन आठवडे बंद

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० मार्च :** इराण आणि अमेरिकेच्या युद्धाचा आज (मंगळवार १० मार्च) अकरावा दिवस आहे. या युद्धाचा भीषण परिणाम थेट पाकिस्तानवर झाला आहे. या युद्धामुळे पाकिस्तान भिकेला लागला आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानमध्ये वाढत्या इंधन दरांमुळे सरकारने कठोर काटकसरीचे निर्णय घेतले आहेत. इंधनाची बचत करण्यासाठी देशातील शाळा दोन आठवड्यांसाठी बंद ठेवण्यात येणार असून विद्यापीठांमध्ये ऑनलाइन वर्ग घेतले जाणार आहेत.

यासोबतच केंद्र सरकारच्या कार्यालयांमध्ये आता आठवड्यात फक्त चार दिवस कामकाज होणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांपैकी ५० टक्के कर्मचारी घरून काम (वर्क फ्रॉम होम) करतील, ज्यामुळे प्रवासाचा खर्च आणि इंधनाचा वापर कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन महिन्यांसाठी सरकारी विभागांना मिळणारा इंधन भत्ता हा थेट ५० टक्क्यांनी कमी केला जाणार आहे. तसेच महिन्याला ३ लाख रुपयांपेक्षा जास्त वेतन घेणाऱ्या ग्रेड-२० व त्यावरील अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांच्या पगारात कपात केली जाईल. पंतप्रधान शरीफ पुढे म्हणाले की, आगामी काळात तेलाच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता आहे. या वाढीचा भार सर्वसामान्य नागरिकांवर पडू नये, यासाठी आम्ही सातत्याने उपाययोजना करत आहोत.

दुसरीकडे पाकिस्तानातील पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाज शरीफ यांनीही इंधन बचतीसाठी मोठे निर्णय घेतले आहेत. परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत प्रांतीय मंत्र्यांना दिला जाणारा इंधन पुरवठा थांबवण्यात येणार आहे. तसेच सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांसाठी पेट्रोल आणि डिझेल भत्ता तात्काळ ५० टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे.

याशिवाय, प्रांतीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आता केवळ एकच प्रोटोकॉल वाहन वापरण्याची परवानगी दिली जाणार आहे. इंधनाचा वापर कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे जागतिक बाजारात तेलाच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल १०७.९७ डॉलरपर्यंत पोहोचली असून वेस्ट टेक्सास इंटरमिजिएट १०६.२२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहे. गेल्या साडेतीन वर्षांतील हा उच्चांक मानला जात आहे.

इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेमधील तणावामुळे तेल उत्पादन आणि पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. विशेषतः जगातील सुमारे २० टक्के तेल वाहतूक होणाऱ्या होर्मूझ सामुद्रधुनीत सुरक्षेचा धोका वाढल्याने जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे.




**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० मार्च :** पारा चाळीशीच्या जवळ गेल्याने भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये उष्णतेची लाट आल्याचा इशारा दिला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांतही उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. ऋश्रोसीरहिळल ठशषशीशपलश

गेल्या दोन दिवसांपासून राज्यात सर्वत्र तीव्र उष्णतेची लाट सक्रिय झाली असून, सोमवारी विदर्भातील अकोला येथे ४०.९ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली. त्यामुळे दुपारी १२ ते ४ पर्यंत घराबाहेर पडताना खबरदारी बाळगण्याचा इशारा हवामानतज्ज्ञांनी दिला आहे. मुंबईशिवाय रायगड, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला आणि अमरावती आदी जिल्ह्यांसाठी उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मुंबईत सोमवारी कमाल तापमान ३८.९ अंश सेल्सिअसवर पोहोचले आणि उष्णतेची लाट उसळली. सांताक्रूझ वेधशाळेच्या माहितीनुसार, किमान तापमान २४ अंश सेल्सिअस होते. तापमानात सातत्याने होणारी वाढ पाहता हवामान विभागाने सोमवार आणि मंगळवारी मुंबई, ठाणे आणि पालघरच्या काही भागात उष्णतेची लाट जाहीर केली. यलो अलर्टमुळे दुपारी १२ ते दुपारी ३ दरम्यान उच्च तापमानाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.राष्ट्रीय बातम्या

यंदाच्या उन्हाळी हंगामाला आता सुरुवात झाली असून, राज्याचा पारा सोमवारी ४० अंशांवर गेला. अकोला येथे ४०.९, सोलापूर ४०.२, तर पुणे शहराचा पारा ३९ अंशांवर गेला होता. सोमवारपासून राज्यातील सर्वच भागांत दुपारी १२ ते सायंकाळी ५ पर्यंत उन्हाच्या तीव्र झळा जाणवत होत्या.

### आखाती तरुणांच्या सुरक्षिततेबाबत चिंता

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० मार्च :** महाराष्ट्र विधानपरिषदेत आज कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथे कार्यरत असलेल्या महाराष्ट्रीयन व भारतीय तरुणांच्या सुरक्षिततेचा महत्त्वपूर्ण मुद्दा सभागृहात उपस्थित केला. विशेषतः काही कंपन्यांकडून कामगारांचे पासपोर्ट जप्त करून ठेवण्याच्या प्रथेमुळे उद्भवू शकणाऱ्या गंभीर अडचणींकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

आखाती देशांमध्ये सध्या मोठ्या संख्येने भारतीय, विशेषतः महाराष्ट्रातील अनेक तरुण विविध कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. मात्र अनेक कंपन्यांकडून कामगारांचे पासपोर्ट स्वतःकडे जमा करून ठेवले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत जर या नागरिकांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविण्याची गरज निर्माण झाली, तर पासपोर्ट नसल्यामुळे त्यांच्या स्थलांतरात मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात, असे ॲड. डावखरे यांनी सभागृहात अधोरेखित केले.

# डुबवण्यात जो मजा तो पकडण्यात नाही

## ट्रम्प यांचे जगाची झोप उडवणारे विधान

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाचा आज ११ वा दिवस आहे. यादरम्यानच डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत मोठा खुलासा केला आहे. डोनाल्ड ट्रम्प इराणी जहाजावर केलेल्या हल्ल्याबद्दल यावेळी बोलताना दिसले. डोनाल्ड ट्रम्प यांचे बोलणे ऐकून सर्वांनाच धक्का बसला.



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प गेल्या काही दिवसांपासून तूफान चर्चेत आहेत. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिकेसह इस्त्रायलकडून इराणवर मोठा हल्ला करण्यात आला. आज अमेरिका आणि इराण यांच्या युद्धाला ११ दिवस झाली. युद्ध थांबण्याचे नाव घेत नाही. इस्त्रायल आणि अमेरिकेने केलेल्या बॉम्ब हल्यात १३०० इराणी नागरिकांचा जीव गेला. यासोबतच १७० एकाच शाळेतील मुलींनी हल्ल्यात जीव गमावला. इराणकडून स्पष्ट सांगण्यात आले की, अमेरिकेला आमच्या तेलावर कब्जा हवा. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांना आमच्या तेलावर नियंत्रण हवे आहे. अमेरिका आणि इराण यांच्या युद्धाचा फटका अनेक देशांना बसताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीमध्ये मोठी वाढ झाली असून महत्वाचा समुद्री मार्ग इराणकडून बंद करण्यात आल्याने भारतात एलपीजी गॅसची निर्यात जवळपास बंद झाली. सिलेंडरच्या किंमती वाढल्या असून सध्या व्यावसायिक गॅस सिलेंडर बंद करण्यात आली.

भारताच्या विशाखापट्टनम येथून युद्ध सराव करून इराणच्या दिशेने इराणी युद्धनौका निघाली होती. श्रीलंकेच्या जवळ ही युद्धनौका पोहोचली होती, त्यादरम्यान अमेरिकेच्या पाणबुडीने या युद्धनौकेला जोरात टक्कर दिली आणि ही युद्धनौका बुडली. ८७ इराणी सैनिक यात मारले गेले. आता यावर पहिल्यांदाच डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठे विधान केले.

डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, अमेरिकेच्या सैन्याने मला म्हटले होते की, जहाज पकडण्यापेक्षा ते बुडवणे अधिक मजेशीर आहे. त्यामुळे त्यांनी ते बुडवले. त्यांचे स्पष्टपणे म्हणणे आहे की, बुडवणे अधिक सुरक्षित आहे. मला वाटते की, खरोखरच हे सत्य आहे. अमेरिकेने युद्धनौका बुडवल्यानंतर इराणकडून संताप व्यक्त करण्यात आला होता.

याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे स्पष्ट शब्दात इराणकडून सांगण्यात आले होते. यासोबतच डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, तेहरानला आम्ही अगोदरच झटका दिला आहे. आम्ही ४६ इराणी जहाजे बुडवली आहेत? त्यावर तुम्ही विश्र्वास ठेवणार का? हा पण हे सत्य आहे. इराणच्या कॅपोबिलिटीला आम्ही पूर्णपणे नष्ट केले आहे. इराणची जवळपास लष्करी ताकद संपली आहे.

# मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी 'कम अर्ली-गो अर्ली' सवलत

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची विधानपरिषदेत घोषणा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० मार्च :** मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी कम अर्ली-गो अर्ली सवलत देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विधान परिषदेत केली.




दरम्यान महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द असल्याची ग्वाही देत राज्यातील महिलांना योग्य सन्मान, संधी आणि सुरक्षितता देणारा समाज घडवण्याचा संकल्प अधिक दृढ करण्याचे आवाहनही सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विधानपरिषदेत प्रस्तावावर झालेल्या विशेष चर्चेला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी उत्तर दिले.

महिला दिनाच्या पार्श्र्वभूमीवर कम अर्ली-गो अर्ली या निर्णयानुसार मुंबई महानगर क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ ते ९.४५ या दरम्यान कार्यालयात लवकर येऊन जितकी मिनिटे आधी कामकाज करतील, तितकीच मिनिटे संध्याकाळी कार्यालयातून लवकर निघण्याची, म्हणजेच सुमारे ३० मिनिटांची सवलत देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे गर्दीच्या वेळेत महिलांची होणारी गैरसोय कमी होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे असेही सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या.

सभागृहात झालेल्या चर्चेत अनेक सदस्यांनी महिलांच्या सक्षमीकरणाबाबत महत्त्वपूर्ण सूचना मांडल्याचे सांगत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले. शासन या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करून आवश्यक ती पावले उचलेल, असेही आश्वासन त्यांनी दिले.

महिलांच्या सुरक्षेबाबत बोलताना सुनेत्रा पवार यांनी हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी राज्यात 'ऑपरेशन मुस्कान' मोहिमेअंतर्गत जुलै २०१५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत १४ मोहिमा राबवून ४२ हजार ५९४ बालकांचा शोध घेण्यात आला आहे. तसेच ऑपरेशन शोध मोहिमेतून ५ हजार ६६ महिला आणि २ हजार ७७१ बालकांचा शोध घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'मिसिंग सेल' कार्यरत असून महिलांच्या समस्यांसाठी ५१ 'भरोसा सेल' कार्यान्वित करण्यात आले आहेत असे सांगितले.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्यसरकार विविध योजना प्रभावीपणे राबवत असल्याचे सांगताना सुनेत्रा पवार यांनी 'लाडकी बहीण', 'नमो महिला सक्षमीकरण', 'लेक लाडकी', 'अन्नपूर्णा', 'लखपती दीदी' यांसारख्या योजनांचा उल्लेख केला. बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल, उमेद मार्ट आणि महालक्ष्मी सरस यांसारखे उपक्रम राबविण्यात येत असून बचत गटांची उत्पादने ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती दिली. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनाबाबत आणि पायाभूत सुविधांबाबत शासन सकारात्मक असल्याचे सांगत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यातील १७ हजार २५४ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येत असल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, चर्चगेट आणि बोरिवली स्थानकांवर सायबर गुन्हे रोखण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने महिला शासकीय कर्मचाऱ्यांसाठी १८० दिवसांची प्रसूती रजा मंजूर केली असून प्रसूती रजेनंतर गरज भासल्यास कमाल एक वर्षापर्यंत वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय अर्धवेतनी रजा घेण्यासही परवानगी देण्यात आल्याचे सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. राज्यात चौथे महिला धोरण लागू करण्यात आले असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील महिलांचे जीवन अधिक सुरक्षित आणि सन्मानजनक व्हावे यासाठी 'आदिशक्ती अभियान' राबविण्यात येत असून बालविवाह रोखणे, अत्याचारमुक्त गाव निर्माण करणे आणि मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे हा त्यामागचा उद्देश असल्याचेही सुनेत्रा पवार यांनी नमूद केले.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, बचत गटांचे बळकटीकरण, महिला शेतकरी व कामगारांसाठी विशेष उपाययोजना तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी कायदे आणि त्यांची काटेकोर अंमलबजावणी यावर राज्यसरकारचा विशेष भर असल्याचे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि महाराणी ताराबाई यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक सक्षमीकरणही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सुनेत्रा पवार यांनी नमूद केले.

## थोडक्यात...

### ९१११ डोंबिवलीकरांनी रचला इतिहास मोडला, सांगलीकरांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९ हजार १११ महिला आणि विद्यार्थीनीनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत रविवारी येथील श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला. या आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी सांगितले.

### एण्ड टीव्हीवरील अभिनेत्रींचे महिलांच्या विविध भूमिकांवर भाष्य

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील आघाडीच्या अभिनेत्री महिलांच्या विविध जबाबदाऱ्या आणि भूमिकांबाबत आपले विचार मांडत आहेत. आगामी मालिका 'हे भगवान - कितना बदल गया इंसान' मधील अक्षया नाईक (ईना) यांनी सांगितले की, अभिनेत्री म्हणून काम करताना कुटुंब व वैयक्तिक नातेसंबंध यांचा समतोल राखणे महत्त्वाचे असते. 'घरवाली पेडवाली' मधील प्रियमवदा कांत (लतिका) यांच्या मते स्त्री कलाकार, मुलगी आणि शिकणारी व्यक्ती अशा अनेक भूमिका निभावते. 'हप्पू की उलटन पलटन' मधील गीतांजली मिश्रा (राजेश) यांनी कुटुंबातील महिलांच्या योगदानावर भर दिला, तर 'भाबीजी घर पर है' मधील शिल्पा शिंदे (अंगूरी भाबी) यांनी महिलांनी आत्मविश्र्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले.प्रेक्षकांनी या सर्व मालिकांचा आनंद एण्ड टीव्हीवर दर सोमवार ते शुक्रवार घ्यावा.

### टाटा मोटर्सने महाराष्ट्र ग्रामीण बँकेसोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली

**मुंबई:** टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने त्यांच्या व्यावसायिक वाहन पोर्टफोलिओमध्ये वित्तपुरवठा सेवा प्रबळ करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेसोबत (एमजीबी) सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केल्याची घोषणा केली, जेथे एस प्रो सह त्यांच्या स्मॉल कमर्शियल वेईकल्स व पिक-अप्स (एससीव्हीपीयू) श्रेणीवर मुख्यत्वे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा सहयोग ग्राहकांसाठी वेईकल खरेदी करणे सोपे करेल, जेथे कमी व्याजदर, सोपी कागदपत्रव्यवहार प्रक्रिया आणि त्वरित कर्ज वितरण अशा सेवा देईल. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे ७४८ शाखांचे व्यापक नेटवर्क महत्त्वाकांक्षी उद्योजक, ट्रान्सपोर्टर्स आणि पहिल्यांदा वेईकल खरेदी करणाऱ्या ग्राहकांना किफायतशीर ईएमआय उपलब्ध करून देईल, ज्यासह त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करून विकसित करण्यास मदत होईल.

### पाण्याने तुडूंब भरलेल्या प्रकल्पातून २७ हजार हेक्टरवर रब्बीला पाणी

**खामगाव :** यंदा जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील प्रकल्प पाण्याने तुडुंब भरले होते. याचा फायदा घेत जिल्ह्यातील १३९६ शेतकऱ्यांनी विविध प्रकल्पातून रब्बीचे उत्पादन घेण्यासाठी संबंधित कार्यालयाकडे अर्ज केले होते. त्या अनुषंगाने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पाण्याच्या माध्यमातून सुमारे २७ हजार हेक्टरवरील रब्बी पिकांना पाणी उपलब्ध झाले आहे. खरीप पिकाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी बहुतांश शेतकरी हा यंदा रब्बी पिकांचे उत्पादन घेण्याकडे वळलेला दिसून आला. मागील वर्षी झालेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच प्रकल्पांनी सरासरी ओलांडली होती. त्यामुळे आता अनेक प्रकल्पांत साठा उपलब्ध आहे. वेगवेगळ्या प्रकल्पातून वेगवेगळ्या महिन्यांपासून शेतकऱ्यांना रब्बीचे उत्पादन घेण्यासाठी कालव्यांद्वारे पाणी देत आहे. साधारणत: डिसेंबर ते मार्च अखेर पर्यंत शेतकऱ्यांना या प्रकल्पातून पाणी देण्यात येणार आहे.


### कर्नाटक लोकरीपासून बनवलेल्या घोंगडीला मागणी


**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर मेंढ्यांच्या केसांपासून नैसर्गिक पद्धतीने तयार होणारी पारंपरिक लोकरीची घोंगडी आजही ग्रामीण भागात अंथरूण म्हणून वापरली जाते. पूर्वी हातमागावर तयार होणारी ही घोंगडी बनवण्यासाठी पाच ते सात दिवस लागत होते. मात्र आधुनिक तंत्रज्ञानामुळे आता मशीनच्या सहाय्याने हीच घोंगडी अवघ्या दोन दिवसांत तयार होत असल्याने उत्पादनाचा वेग वाढला आहे. मेंढ्यांच्या लोकरीपासून तयार होणारी ही घोंगडी पूर्णपणे नैसर्गिक असल्याने तिची मागणी कायम आहे. सध्या बाजारात बहुतेक अंथरुणे पॉलिस्टरपासून तयार होत असली तरी पारंपरिक लोकरीच्या घोंगडीचे महत्त्व अजूनही टिकून आहे. सोलापूर येथील व्यापारी कर्नाटकातून मेंढ्यांची लोकर आणून त्यापासून घोंगड्या तयार करतात. या घोंगड्या विक्रीसाठी पैठण येथे भरत असलेल्या नाथषष्ठी यात्रेत मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आल्या आहेत. पारंपरिक पद्धतीने तयार होणाऱ्या या घोंगडीला आता शहरांमधूनही चांगली मागणी मिळत आहे. डॉक्टर, तसेच काही व्हीआयपी व्यक्तीदेखील अंथरूण म्हणून या घोंगडीचा वापर करीत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. सध्या घोंगडीला मागणी असल्याचे विक्रेत्याने सांगितले. सोलापूर येथील विक्रेत्याने येथे विक्रीसाठी आणलेल्या घोंगड्या. आरोग्यदायी गुणधर्मांमुळे घोंगडीचा वापर वाढतोय घोंगडीची किंमत आकार, जाडी आणि गुणवत्तेनुसार ५०० रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत असते. ७ वर्ष घोंगडी टिकते. पावसाळ्यात देखील पाण्यात ओली होत नाही. थंडीपासून संरक्षण देण्याबरोबरच घोंगडीमध्ये नैसर्गिक उष्णता असल्याने पित्त कमी होणे, सांधेदुखी व अंगदुखी कमी होणे, तसेच शरीराला आराम मिळणे अशा आरोग्यदायी गुणधर्मांमुळे तिचा वापर वाढत असल्याचे विक्रेते सांगतात. चार पिढ्यांपासून घोंगडी विक्रीचा व्यवसाय आहे. दरवर्षी नाथषष्ठी यात्रेत आम्ही विक्रीसाठी येतो. लोकरीची घोंगडी आरोग्यासाठी फायदेशीर असल्याने व्हीआयपी आणि डॉक्टरदेखील ती अंथरूण म्हणून वापरतात.


# १००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० मार्च :** भक्तामर कलश तीर्थ, भांडगाव (यवत), पुणे येथे ११ ते १५ मार्च २०२६ दरम्यान १००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव प.पू. जगद्गुरू गणधराचार्य श्री कुंथुसागर गुरुदेव यांच्या सान्निध्यात, गणाचार्य पुष्पदंतसागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. आचार्य प्रणाम सागरजी यांच्या निर्देशनात होणार आहे,







अशी माहिती प्रकाश अजमेरा, किशोर शहा, सुजाता शहा, सारंग शहा व स्वप्निल शहा यांनी दिली.

११ ते १५ मार्च दरम्यान ध्वजारोहण, गर्भकल्याणक, जन्मकल्याणक, दीक्षा, ज्ञान व मोक्ष कल्याणक असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार असून प्रतिष्ठाचार्य पं. महावीर जैन, पं. मांगीलाल लोलावत, पं. पंकज उपाध्ये व पं. कपिल पाटणी यांच्या हस्ते विधी पार पडतील.

१२ मार्च रोजी भक्तामर ज्योतिष सम्मेलनात पं. विनोदजी जैन, नीता पंकज जैन, डॉ. स्नेहल रावका व रवि गुरुजी मार्गदर्शन करणार आहेत. १४ मार्च रोजी भक्तामर हीलर महोत्सव तसेच ४८०० मीटर हस्तलिखित भक्तामर वस्त्रांची झांकी सादर होणार असून वर्ल्ड रेकॉर्डचा प्रयत्न केला जाणार आहे.

या महोत्सवाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार राहुलदादा कुल, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार डॉ. अमोल कोल्हे, राजू शेट्टी यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. आयोजन प्रकाश अजमेरा, किशोर शहा, महावीर पाटणी, प्रमोद ठोले, सुजाता शहा, सारंग शहा, स्वप्निल शहा, नीता ठोले, विपीन पाडे, वर्धमान कासलीवाल व काजु कासलीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

## पं. स. सभापतीपदी वैशाली बोंबले तर उपसभापतीपदी संजय लघाने बिनविरोध



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १० मार्च :** पैठण पंचायत समितीच्या १८ पैकी १७ जागा जिंकणाऱ्या शिवसेनेकडुन सभापती पदी ढोरकीन गणातून निवडून आलेल्या वैशाली विनोद बोंबले तर उपसभापती पदी रांजणगांव खुरी गणातून विजयी झालेले संजय लघाने यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी पंचायत समिती सभागृहात आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सभापती बोंबले आणि उपसभापती लघाने यांचा सत्कार करण्यात आला.

पंचायत समिती सभागृहात गटविकास अधिकारी मानोरमा गायकवाड, विस्तार अधिकारी राजेश कांबळे, निवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य प्रियंका भुजंग, अक्षय गवारे, सविता आडे, कशाबाई कोल्हे,नर्मदा नलावडे, अलका गोजरे, राहिबाई शिंदे, उदयसेन काळे, अलका शेळके, दादा गलांडे, भारत मुकुटमल, प्रमोद पन्हाळकर, प्रदीप नरके, मनोज गायके, सकूबाई झारगड यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजु नाना भुमरे, शिवाजी नागरी बँकेचे चेअरमन रवींद्र पा. काळे, राज्य दूध संघाचे नंदू काळे, शिवसेना तालुकाप्रमुख आण्णासाहेब लबडे,नाथ संस्थानचे कार्यकारी विश्र्वस्त दादा बारे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख विनोद बोंबले,ज्योती काकडे,स्वीय सहाय्यक सतिष अंधारे, नामदेव खराद,अनिकेत धारकर, राजेंद्र तांबे, विजयभाऊ गोरे, चेअरमन अमोल एरंडे, बालाजी नलभे, किशोर चौधरी, अप्पासाहेब निर्मळ,डॉ भारत झारगड, आबासाहेब गिरगे,अस्लम पठाण, अक्षय पा. डुकरे,संतोष बोठे, महेश बोंबले, योगेश फासाटे सह मोठया संख्येने शिवसेना पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

## शेतकरी गटांना सेंद्रिय शेती प्रमाणीकरणचे प्रमाणपत्र वितरण

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि. १० मार्च :** तालुका कृषी अधिकारी कार्यालय गंगापूर अंतर्गत सेंद्रिय शेती प्रमाणीकरण अंतर्गत प्राथमिक प्रमाणपत्र तालुका कृषि अधिकारी बापुराव जायभाय यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

यावेळी बोलताना तालुका कृषी अधिकारी बापुराव जायभाय यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षापासून डॉ पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान तालुक्यातील दहा गावात राबवले जात असून या माध्यमातून सुमारे ५८६ शेतकऱ्यांना ५०० हेक्टर शेती सेंद्रिय करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. यासाठी शेतकऱ्यांनि पहिल्या वर्षी जीवामृत दशपर्णी अर्क बनवण्यासाठी ड्रम खरेदी केलेली होती. नंतरच्या काळात जैविक कुंपण, नैसर्गिक बीज प्रक्रिया, माती परीक्षण अशा विविध आयुधांचा वापर केला आहे. या सर्व शेतकऱ्यांनी आपला शेतमाल नैसर्गिक माल म्हणून अधिकृत विक्री करण्यासाठी त्यांना पहिले नैसर्गिक शेती प्रमाणीकरण



प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी नैसर्गिक शेतकऱ्यांची कश्यपमुनी शेतकरी उत्पादक कंपनी चे अध्यक्ष भागवत साळुंखे, सचिव उमेश बंग, साईनाथ चव्हाण, किरण दाणे यांच्यासहमंडळ कृषिअधिकारी बोरुडे, कृषि सहायक खेडकर मॅडम,आत्मा चे भगवान लघाणे, चंद्रकांत तायडे, दिलीप मोटे आणि शेतकरी उपस्थित होते.

## खुलताबाद पंचायत समिती सभापतीपदी सुनिता खंडागळे, उपसभापती मंदाबाई वाकळे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. १० मार्च :** पंचायत समिती सभापती पदी भारतीय जनता पार्टी च्या सुनिता संजय खंडागळे .व शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या उपसभापतीपदी मंदाबाई बद्री वाकळे यांची निवड खुलताबाद पंचायत समिती सभागृहात निवडणूक प्रक्रिया तहसीलदार संतोष गुट्टे यांच्या उपस्थितीत पार पडली.

याप्रसंगी नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे योगिता बर्डे सुरेश जाधव अंजनाबाई साळुंखे.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण. जिल्हा उपाध्यक्ष वसंत शिरसाट



गल्लेबोरगावकर जिल्हा सरचिटणीस विकास कापसे जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे अरुण आघाडे उपनगराध्यक्ष नगरपरिषद खुलताबाद उपाध्यक्ष नवनाथ बारगळ शिवसेना तालुकाप्रमुख राजू वरकड परसराम बारगळ नवनिर्वाचित सभापती उपसभापती यांचे गटविकास अधिकारी तथा पंचायत समिती सचिव प्रकाश नाईक यांनी सत्कार केला याप्रसंगी बांधकाम विभागाचे नरेंद्र देशमुख एमआर इ जी एस अभिजीत गायकवाड यांच्या सर्व कर्मचारी उपस्थित होते

## टेकडी बहिणींचा पहिला रोजा



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १० मार्च :** पैठण नेहरू चौकातील महिरा जावेद टेकडी वय ७ वर्षे आणि युसरा जावेद टेकडी वय ६ वर्षे या दोघी चमूकल्या बहिणींनी आपल्या आयुष्याचा पहिला रोजा सोमवारी पूर्ण केला. यासाठी या दोघी चिमुकलिंचे नातेवाईक, आपतेस्ट, मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या.

## सोयगाव येथे कर्तृत्वान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १० मार्च :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे दि.७ शनिवार रोजीजागतिक महिला दिन निमित्त कतृत्वान महीलाचा सन्मान करण्यात आला.यावेळी मान्यवराच्या शुभहस्ते राजमाता जिजाऊ,माता रमाई आंबेडकर,पुण्यश्र्लोक अहील्याबाई होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्योलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,सोयगाव नगराध्यक्षा आशाबी तडवी, नवनिर्वाचित पचायत समिती सदस्या सविताताई गव्हाडे, नगरसेविका कुसूमताई दुतोंडे,माजी विद्यार्थीनी निशा मधूकर पगारे,तहसील कार्यालयातील वरीष्ठ लिपीक उज्वला वामने तसेच पंचायतसमिती सहाय्यक गटविकास अधिकारी दौड तसेच सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांच्या सह पदाधिकारी व महिला माता पालक यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी शाळेतील कर्तृत्ववान माजी विद्यार्थीनी शाळेतील विद्यार्थ्यांना ऑनलाइन पध्दतीने अनमोल असे मार्गदर्शन केले.यात डॉ.दिपाली निकुंभ अबाजोगाई,डॉ.सोनाली निकुंभ चिकलठाणा,चारुशिला पाटील स्विय सहाय्यक मंत्रालय मुबंई,प्राजक्ता रोकडे,डॉ.ज्योती पंडीत वैद्यकियअधिकारी,प्रीती दामधर करनिरक्षक न.पा.तसेच सर्व मान्यवरांनी शाळेच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त करून शाळा डिजिटल झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी समाजसेवक राजू दुतोंडे,समाजसेवक सुनिल गावंडे,समाजसेवक विजय



काळे,समाजसेवक अंकुश पगारे, समाजसेवक मयुर मनगटे,प्रशांत जाधव यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरीक,पालक उपस्थित होते.नवनिर्वाचित जिल्हा परीषद सदस्या पुष्पाताई काळे व माजी विद्यार्थीनी निशा पगारे यांनी विद्यार्थ्याना व माता पालकांना मार्गदर्शन केले.यावेळी वर्ग पहीली मध्ये नविनप्रवेश घेतलेल्या सतरा विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी, पंकज रगडे, मंगला बोरसे, रामचंद्र महाकाळ, सविता पाटील,गणेश बाविस्कर,प्रतिभा कोळी, अकुश काळे, विवेक महाजन, अनिल देसाई, तान्हाजी चव्हाण,शुभम देसले, पुनम लाड यांनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रतिभा कोळी यांनी तर आभार प्रदर्शन सविता पाटील यांनी केले.

## लासूर स्टेशनमध्ये स्मार्ट मीटरवरून संताप; पूर्वसूचना न देता रात्रीच मीटर बदलण्याचा घाट

**ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण; पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप**

**तभा वृत्तसेवा/ तुषार सराफ**

**लासूर स्टेशन, दि. १० मार्च :** लासूर स्टेशन परिसरात महावितरणकडून जुने वीज मीटर काढून त्यांच्या जागी स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सध्या सुरू आहे. मात्र या प्रक्रियेवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता रात्रीच्या वेळी अचानक स्मार्ट मीटर बसवले जात असल्याने अनेक प्रश्र्न निर्माण झाले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एका खाजगी एजन्सीकडून हे काम केले जात असून कर्मचारी अचानक येऊन जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसवत आहेत. या बदलाबाबत कोणतीही लेखी नोटीस देण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मीटर बदलण्यामागील कारण, त्यानंतरची बिलिंग पद्धत आणि नवीन मीटरची कार्यप्रणाली याबाबत अधिकृत माहिती न दिल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. जर मीटर बदलणे आवश्यक असेल, तर त्याबाबत ग्राहकांना आधी माहिती देणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी अचानक मीटर बदलणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया काही ग्राहकांनी दिली.

काही भागात अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर मीटर बदलण्यात आल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिल वाढल्याच्या चर्चांमुळेही नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. जरी अधिकृत पातळीवर मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंद झालेल्या नसल्या, तरी पारदर्शकतेबाबत प्रश्र्न उपस्थित होत आहेत.

नागरिकांकडून मीटर बदलण्यापूर्वी लेखी सूचना देणे, जुन्या मीटरचे अंतिम रीडिंग ग्राहकांसमोर नोंदविणे आणि बिलिंग प्रक्रियेबाबत स्पष्ट माहिती देण्याची मागणी करण्यात येत आहे. अन्यथा या प्रकाराविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

स्मार्ट मीटर अंमलबजावणी ही शासनाची योजना असली तरी तिची अंमलबजावणी करताना प्रशासन आणि ग्राहक यांच्यात पारदर्शकता व समन्वय आवश्यक असल्याचे मत स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

**सोलरधारकांसाठी स्मार्ट मीटरचा फटका? आधी बिल भरा, नंतर समायोजन – ग्राहकांमध्ये नाराजी**

स्मार्ट मीटर बसवण्याच्या मोहिमेमुळे सोलर प्रकल्प उभारलेल्या ग्राहकांमध्येही असंतोष वाढू लागला आहे. घरावर सोलर प्लेट बसवण्यासाठी तीन ते चार लाख रुपयांची गुंतवणूक केलेल्या नागरिकांना तयार होणाऱ्या वीज युनिटचा त्वरित फायदा मिळत नसल्याची तक्रार पुढे येत आहे.

**–शिला भगवान गाढे,**
**ग्रामपंचायत सदस्य लासूर स्टेशन**

लासूर स्टेशन परिसरात वीज ग्राहकांच्या घरी कोणतीही पूर्वसूचना न देता जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याचे प्रकार तात्काळ थांबवावेत. नागरिकांना विश्र्वासात न घेता अशा पद्धतीने मीटर बदलणे योग्य नाही. वीज ग्राहकांना आधी लेखी सूचना देणे,संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे करणे आवश्यक आहे. अन्यथा भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयावर मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्यात येईल.

मार्च महिन्यात तयार झालेल्या वीज युनिटचा हिशोब एप्रिलमध्ये केला जातो. त्यामुळे ग्राहकांना आधी पूर्ण वीज बिल भरावे लागते आणि नंतर त्या युनिटचे समायोजन केले जाते. आधी बिल भरा, नंतर पैसे वजा करू ही पद्धत सर्वसामान्यांसाठी अन्यायकारकच आहे.

**अविनाश संगेकर,**
**स्थानिक पत्रकार लासूर स्टेशन**

सोलर प्रकल्पासाठी मोठी गुंतवणूक करूनही अपेक्षित फायदा मिळत नसल्याने ग्राहकांमध्ये नाराजी वाढत आहे. एकीकडे स्मार्ट मीटरची सक्ती आणि दुसरीकडे सोलर युनिटच्या समायोजनातील विलंब यामुळे सामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे चित्र दिसत आहे.

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय**
**क. स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४८/२०२६
अर्जदार : सुदेश चंदर खाजेकर,
रा.फुलेनगर, गंगापुर, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर
विरुध्द
गैरअर्जदार:- निरंक
प्रकरण:-वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ड. व्ही. जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत इेलरू ठशर्सीश्ररींळेप -लीं तखखख १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत हिराबाई चंदर खाजेकर यांचा दि.२१/०७/२०२० रोजी नगर परिषद गंगापुर हददीत वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला असुन मयत हिराबाई चंदर खाजेकर यांचे पती नामे चंदर किसन खाजेकर यांचा दि.०८/०४/२००६ रोजी नगर परिषद गंगापुर हददीत वृध्दापकाळामुळे मृत्यु झाला आहे. मयत हिराबाई चंदर खाजेकर आणि मयत चंदर किसन खाजेकर हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार यांचा जन्म झाला आहे. अर्जदार मयत हिराबाई चंदर खाजेकर आणि मयत चंदर किसन खाजेकर यांचा मुलगा आहे. मयत हिराबाई चंदर खाजेकर आणि मयत चंदर किसन खाजेकर यांना अर्जदार एकमेव कायदेशीर वारस असुन त्यांचे शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस मयतांना नाही. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी इेलरू ठशर्सीश्ररींळेप -लीं तखखख १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी दिले.

पुढील तारीख २८/०४/२०२६

**कनिष्ठ लिपीक.** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर**

## संक्षिप्त वृत्त...

### नारिस्फूर्ती महिला मंडळातर्फे एकल माता पालक महिलांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील लोकमान्य नगर परिसरातील नारिस्फूर्ती महिला मंडळाच्या वतीने रविवार ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात एकल माता पालक महिलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सौ. रविना परिहार यांनी भूषविले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मंजुषा नरवाडकर व सुनीता सुरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस ॲड. संगीता परिहार यांनी प्रस्ताविकपर भाषण करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. या कार्यक्रमात नारिस्फूर्ती महिला मंडळाच्या वतीने कॉलनीत राहणाऱ्या व मंडळाच्या सदस्य असलेल्या कष्टाळू महिलांचा सत्कार करण्यात आला. विशेषतः पतीच्या निधनानंतर मुलांचे संगोपन करत कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या 'एकल माता पालक' महिलांचा गौरव करण्यात आला. यामध्ये श्रीमती हर्षा मोरे, श्रीमती अरुणा गायकवाड, श्रीमती अरुणा मोरे व श्रीमती अनिता काकडे यांचा मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात सौ. उज्वला टाक, सौ. मंगल गोरे तसेच डॉ. सौ. प्रियंका शिरसीकर यांनी मनोगत व्यक्त करून महिलांच्या सामर्थ्य व संघर्षमय जीवनाबद्दल विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मिनल शहाणे यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. विजयश्री पाथ्रीकर यांनी केले.

### मानवत पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता

#### सभापतीपदी ललिता निर्वळ तर उपसभापती पदी सुरज काकडे यांची बिनविरोध निवड

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ललिता उद्धवराव निळे यांची तर उपसभापतीपदी सुरज सुंदरराव काकडे यांची मंगळवार (दि. १० मार्च) रोजी झालेल्या विशेष सभेत बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर मानवत तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पंचायत समितीवर एकहाती सत्ता काबीज केली आहे.

मानवत पंचायत समितीच्या सभागृहात दुपारी २ वाजता सभापती व उपसभापती निवडीची प्रक्रिया पार पडली. सभापतीपदासाठी ताडबोरगांव पंचायत समिती गणातून निवडून आलेल्या राष्ट्रवादीच्या ललिता उद्धवराव निळे तर उपसभापतीपदासाठी पाळोदी पंचायत समिती गणातून निवडून आलेले सुरज सुंदरराव काकडे यांचे एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने दोघांचीही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचे जोरदार स्वागत केले. फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या प्रसंगी पंचायत समिती सदस्य उद्धवराव हरकळ, सौ. ज्योती लक्ष्मण शिंदे, अनिला रणखांब, शहनूर पठाण, सरस्वती नाईक, सौ. प्रमिला शिवाजी उक्कलकर आदी सदस्य उपस्थित होते. तसेच आमदार राजेश विटेकर, बाजार समितीचे सभापती पंकज आंबेगावकर, उपसभापती नारायणराव भिसे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सभापती गंगाधरराव कदम, जि.प. सदस्य दत्तात्रय जाधव, मुकुंदराव मगर, संतोषराव लाडणे, गजानन धाडूळ आदींनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापतींचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, निवडणूक प्रक्रियेचे काम पीठासीन अधिकारी म्हणून अरुणा संगेवार यांनी पाहिले. त्यांना तहसीलदार पांडुरंग माचवे व गटविकास अधिकारी एस. आर. कांबळे यांनी सहकार्य केले.

### सेलू पंचायत समितीच्या सभापतीपदी विजयमाला ढोंबे, उपसभापतीपदी सुलभाबाई घुगे यांची बिनविरोध निवड

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू पंचायत समितीच्या सभापतीपदी सौ. विजयमाला ग्यानोजी ढोंबे तर उपसभापतीपदी सौ. सुलभाबाई ज्ञानोबा घुगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवड प्रक्रियेनंतर नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी स्वागत करून अभिनंदन केले. यावेळी भाजपा सेलूचे आजी-माजी पदाधिकारी, बूथ प्रमुख, महिला मोर्चा, युवा मोर्चा तसेच विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
या प्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांनी सौ. विजयमाला ढोंबे व सौ. सुलभाबाई घुगे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच पप्पू भैया ढोंबे यांचेही कार्यकर्त्यांकडून विशेष अभिनंदन करण्यात आले.

### सोनपेठ पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादीच्या निकिता अवचारे यांची निवड : उपसभापतीपदी पद्मसिंह देशमुख

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** सोनपेठ पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या निकिता श्याम अवचारे यांची तर उपसभापतीपदी पद्मसिंह देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सोनपेठ येथील पंचायत समितीच्या कै. माजी आमदार उत्तमराव विटेकर सभागृहात पीठासीन अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक डॉ. रतनसिंह साळोखे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार १० मार्च रोजी सभापती व उपसभापती पदाच्या निवडीसाठी विशेष सभा घेण्यात आली. सभापती पद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या निकिता अवचारे या एकमेव उमेदवार म्हणून निवडून आल्या. तर शेलगाव गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे पद्मसिंह देशमुख हे उपसभापतीपदी बिनविरोध निवडून आले. निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांनी परिसरात फटाक्यांची आतषबाजी करत ढोल-ताशांच्या गजरात आनंदोत्सव साजरा केला.

### आदिवासी आरक्षणात गैर-आदिवासींची घुसखोरी थांबवा

#### अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** आदिवासी समाजाच्या आरक्षणात गैर-आदिवासींची घुसखोरी रोखावी तसेच आदिवासींचे हक्क अबाधित ठेवावेत, अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या परिषदेचे युवा जिल्हाध्यक्ष संतोष धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली विजय बेले, कॉ. प्रसाद गोरे, पंडित पोटे, कॉ. प्रेम धोंगडे, कॉ. भारत पवार, कॉ. स्नेहल घुगे, श्रध्दा भालेराव, प्रज्ञा सुगंधे, विष्णु ढाकरगे, कृष्णा जवादे, वैजनाथ खुडे, ज्ञानेश्वर पिंपरे, किशन कोकाटे, दत्ता कोकाटे, कैलास ढाकरे, बाळू चाफे व नागनाथ जवादे आदींच्या एका शिष्टमंडळाने आज मंगळवार १० मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्या संदर्भातील निवेदन साद केले. त्याद्वारे, बंजारा समाजासाठी स्थापन करण्यात आलेल्या एसटी आरक्षण अभ्यास गट समितीचा शासन निर्णय आहे.

# अखेर गंगाखेड पंचायत समितीत कमळ फुलले

## सभापतीपदी मनोज मुंडे, तर उपसभापती सारिका खांडेकर : आमदार गुट्टे यांचे वर्चस्व

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** गेल्या काही वर्षांपासून प्रशासकराज असलेल्या गंगाखेड पंचायत समितीचा कारभार आला लोकशाही पध्दतीने चालण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत निवडूण आलेल्या सर्व सदस्यांच्या बहुमताने सभापती म्हणून मनोज मुंडे, तर उपसभापतीपदी सारिका खांडेकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे पंचायत समितीवर कमळ फुलल्यामुळे स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांचे एकहाती वर्चस्व निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य असलेले लक्ष्मण मुंडे यांचे चिरंजीव मनोज लक्ष्मण मुंडे यांची



नवनिर्वाचित सभापती म्हणून वर्णी लागली आहे. अवघे २६ वर्षीय युवक असलेले मनोज मुंडे हे सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने लोकांशी संपर्क ठेवणारे आणि विकासकामांबाबत आग्रही असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सभापतीपदी त्यांच्या निवडीमुळे पंचायत समितीच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, तसेच तालुक्यातील विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा स्थानिक आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे उपसभापतीपदी निवड झालेल्या सारिका रमेश खांडेकर या देखील समाजकार्याची जाणीव ठेवून काम करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून परिचित आहेत. ग्रामीण भागातील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा सक्रिय सहभाग आणि लोकाभिमुख दृष्टिकोन पंचायत समितीच्या कामकाजाला निश्चितच बळ देणारा ठरेल, असाही विश्वास असल्याचे आ.डॉ.गुट्टे यांनी नमूद केले. तालुक्यातील पायाभूत सुविधा, शिक्षण, पाणीपुरवठा, आरोग्य आणि ग्रामीण विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये नव्या नेतृत्वाकडून सकारात्मक निर्णय होतील. तसेच गावखेड्यातील सर्वसामान्य लोकांच्या विश्वासाला पात्र ठरत दोघेही विकासाच्या कामांना प्राधान्य देतील, अशीही भावना आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केली. दरम्यान, या निवडीमुळे गंगाखेड पंचायत समितीच्या कार्याला नवी दिशा आणि नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त करत आ.डॉ.गुट्टे यांनी नवनिर्वाचित सभापती मनोज लक्ष्मण मुंडे आणि उपसभापती सारिका रमेश खांडेकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळो, अशीही अपेक्षा व्यक्त केली.

## जिंतूर तालुक्यातील ग्रामसेवक दैनंदिनी सादरच करीत नाहीत पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे कार्यवाही चे आदेश

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत ग्रामसेवक /ग्राम विकास अधिकारी आपल्या कार्याची नोंद वही दैनंदिनी सादर न करताच त्यांचा अलबेल कारभार चालत असल्याची माहिती उघडकीस आली आहे
जिंतूर तालुक्यातील एकूण ६५ ग्रामसेवक पैकी ६३ ग्रामसेवक आपल्या दैनिक कार्याची नोंद न ठेवता अथवा दैनंदिनी सादर न करताच आपला कार्यभार करतात असे माहिती अधिकार कायद्या मुळे उघडकीस आले आहे या बाबत भाजप चे व्यापारी जिल्हा आघाडी चे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार यांनी जिंतूर चे गटविकास अधिकारी यांना ग्रामसेवक दैनंदिनी ची मागणी दि २९/७/२०२५ रोजी मागील दि १/४/२०२२ ते दि १/७/२०२५ कालावधीची मागणी केली होती परंतु दोन महिने उलटूनही पंचायत समिती कडून माहिती मिळाली नाही प्रथम अपिलार्थी म्हणून अर्ज केल्या नंतर गटविकास अधिकारी यांनी दि २४/१०/२०२५ रोजी १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश देताच माहिती अधिकारी यांनी दि ७/११/२०२५ रोजी अशी माहिती दिली की एकूण ६५ ग्रामसेवक कार्यरत असून त्या पैकी तीन ग्रामसेवक जी ए पांढरे,यांची दि ६/८/२०२४श्रीमती के ए घुगे,यांची ३/२/२०२४ व जी एस साळवे यांची दि दि ४/५/२०२४ पर्यंत ची डायरी या तीन ग्रामसेवक यांनी वरील प्रमाणे दैनंदिनी सादर केली आहे त्याची माहिती सह डायरी दिली उर्वरित ६२ग्रामसेवक दैनंदिनी (डायरी )सादरच करीत नाही म्हणून कोकडवार यांनी दि ७/१/२०२६ पासून कार्यवाही ची मागणी केली परंतु पंचायत समिती स्तरावर दखलच घेतली गेली नाही म्हणून त्यांनी थेट परभणी जिल्हा पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांना दि १/३/२०२६ रोजी लेखी पत्र देऊन कार्यवाही ची मागणी केली असता पालकमंत्री यांनी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी परभणी यांना सदर प्रकरणाची तपासणी करून कडक कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत.

एकंदर जिंतूर पंचायत समिती कार्यालयात कधीही कोणताही अधिकारी कर्मचारी कधीच टेबलवर जागेवर नसतात मुख्यालय ठिकाणी राहत नाहीत परिणामी शेतकरी नागरिक त्रस्त होताना नेहमी दिसून येतात.

### गुंज यात्रेसाठी बससेवा सुरु करा

**पाथरी,/प्रतिनिधी :** १
पाथरी तालुक्यातील गुंज येथे होणाऱ्या यात्रेदरम्यान भाविकांची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी अतिरिक्त बससेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आमदार राजेश विटेकर यांनी पाथरी आगार व्यवस्थापकांना दिलेल्या लेखी पत्राद्वारे केली आहे.

१५ मार्च ते २० मार्च या कालावधीत आयोजित केलेल्या गुंज येथील यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक व प्रवासी येत असतात.

1

### पूर्णा पंचायत समितीच्या सभापती पदी सौ. उज्वला नारायणराव पिसाळ तर उपसभापतीपदी काशिनाथराव काळबांडे यांची निवड

**पूर्णा,/प्रतिनिधी :** पूर्णा पंचायत समितीच्या सभापतीपदी सौ. उज्वला नारायणराव पिसाळ यांची तर उपसभापतीपदी काशिनाथराव काळबांडे यांची निवड झाल्याने तालुक्यातील राजकीय वर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडीनंतर विविध स्तरातून दोघांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पंचायत समितीच्या सभागृहात पार पडलेल्या निवड प्रक्रियेत सौ. उज्वला पिसाळ यांची सभापती म्हणून निवड जाहीर करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे पूर्णा तालुक्यातील विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या पिसाळ यांनी यापूर्वीही विविध उपक्रमांमधून आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. पंचायत समितीच्या उपसभापतीपदी काशिनाथराव काळबांडे यांची निवड झाली. ते खासदार बंडू जाधव यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या निवडीमुळे खासदार जाधव समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पंचायत समिती जिंतूर सभापतीपदी सौ आयोध्या किशोर खिस्ते आणि उपसभापतीपदी सौ सोनीताई माधव दराडे

**जिंतूर /प्रतिनिधी-** आज पंचायत समिती जिंतूर सभापती आणि उपसभापती पदाची निवड प्रक्रिया पार पडली.

या प्रक्रियेमध्ये भाजपा हा सर्वात मोठा पक्ष म्हणून एकूण २० पैकी तब्बल १४ जागा निवडून आलेल्या होत्या.

महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ मेघना साकोरे बोर्डीकर आणि जिल्ह्याचे नेते माजी आमदार श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेब यांच्या मार्गदर्शना खाली पंचायत समिती जिंतूर सभापतीपदी सौ आयोध्या किशोर खिस्ते आणि उपसभापतीपदी सौ सोनीताई माधव दराडे यांची बिनविरोध निवड झाली या निवड प्रसंगी



सभागृहामध्ये भाजपाचे सर्व सन्माननीय सदस्य गटनेते भास्कर ठोंबरे, सौ सरिता नागरे,सौ आशामती घुगे, सौ अश्विनी दाभाडे,सौ पूजा ढोणे,सौ मीरा वजीर, सौ रंजना सांगळे,श्री बाळासाहेब साखरे,श्री भगवान देशमुख,श्री तहसील देशमुख,श्री धम्मपाल प्रधान, श्री परमेश्वर ठाकरे सर्व हजर होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री शैलेश लाहोटी यांनी सर्व प्रक्रिया शांततेमध्ये पार पाडली गेली याप्रसंगी सन्माननीय नवनिर्वाचित सभापती आणि उपसभापती यांचा सत्कार मा.आमदार रामप्रसादजी बोर्डीकर साहेब यांच्या हस्ते संपन्न झाला या प्रसंगी डॉ.पंडित दराडे, भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे, सुनील भोंबे, सुनील मते,भगवानराव वटाणे,रोहित चव्हाण,कैलास खंदारे,आत्माराम पवार,प्रसाद बुधवंत, प्रभाकर दराडे,प्रकाशराव दाभाडे, उपसभापती सुंदर सुंदरराव चव्हाण,रमेशराव ढवळे,गजानन वराड,शिवाजी काळे, सुदामराव गायकवाड,सुरेश मामा खिस्ते, शिवाजी कदम,भास्कर थिटे,बंडू लांडगे,माऊली मार्कड,प्रल्हादराव ढोणे,मतीन तांबोळी, सचिन आडे,संतोष राठोड,अशोक खूपसे,पांडुरंग भगस, अमोल जगताप,बाबाराव काटमोरे,मोहन खंदारे, विनोद गडदे,रामा काठमोरे,राधाकिशन गायकवाड,माऊली गायकवाड सर्व भाजपाचे सन्माननीय सदस्य आणि ग्रामीण भागातील सर्व सरपंच,उपसरपंच,चे अरमन उपस्थित होते

## डॉ. जायभाये यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**सोनपेठ,/प्रतिनिधी :-** एकता फाउंडेशन महाराष्ट्र च्या वतीने सन २०२५-२०२६ वर्षासाठी साहित्य क्षेत्रातील पुरस्कार श्री अनंत कराड (शिरूर कासार) यांनी घोषित केला आहे. यात कथा, कादंबरी, कविता, संकीर्ण अशा विविध साहित्य प्रकारातील कलाकृतींचे पुरस्कार जाहीर झाले आहेत.

त्यामध्ये कै.लताबाई पुरुषोत्तम बारडकर राज्यस्तरीय संकीर्ण साहित्य पुरस्कार नव्या पिढीतील संत साहित्याचे साक्षेपी अभ्यासक, व्याख्याते, कवी, कीर्तनकार प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये यांच्या जगद्गुरू संत तुकोबांचे अभंग विवेचन ''तुकाराम नीती'' ग्रंथाला जाहीर झाला असून दिनांक २४ मार्च रोजी पाडळी ता. शिरूर (कासार) जि.बीड येथे एकता फाउंडेशन आयोजित ८ व्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन डॉ.जायभाये यांचा सन्मान होणार आहे. ''तुकाराम नीती'' हा ग्रंथ डॉ. जायभाये यांनी संपादक डॉ.प्रभु गोरे यांच्या




लोकप्रिय दै.आधुनिक केसरी वर्तमानपत्रात सलग वर्षभर केलेले स्तंभलेखन असून छ.संभाजीनगर येथील श्री वैजनाथ वाघमारे यांच्या शब्दवेध बुक हाऊसने प्रकाशित केला आहे. आत्तापर्यंत या ग्रंथाच्या अनुषंगाने जेष्ठ कवी, लेखक प्रा.इंद्रजित भालेराव, तुकोबांचे वंशज गुरुवर्य जेष्ठ समीक्षक, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.सदानंद मोरे, संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे श्री सचिन पाटील, पोलीस अधीक्षक श्री दिगंबर कदम, कथाकार डॉ.भास्कर बडे, समीक्षक श्री किशन उगले, प्रा.डॉ.ज्ञानदेव राऊत आदी मान्यवरांनी आपले अभिप्राय नोंदवले असून समकालीन परिस्थितीत तुकोबा सर्वांचे पथदर्शी आहेत याचे प्रतिपादन ग्रंथात झाले आहे. या पुरस्काराबद्दल ह.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष परमेश्वर कदम, कोषाध्यक्ष रामेश्वर कदम, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, सर्व सहकारी आदिंसह साहित्य क्षेत्रातून डॉ.जायभाये यांचे अभिनंदन होत आहे.

### वरपुडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक अभ्यास सहल

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** येथील हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठच्या इतिहास, राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभागाच्या वतीने सोमवार ९ मार्च रोजी अभ्यास सहलीचे आयोजन केले होते. सदरिल अभ्यास सहल छत्रपती संभाजी नगर येथील जगप्रसिद्ध पर्यटन स्थळाचा ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक व आर्थिक अभ्यास करून संपन्न झाली.

महाविद्यालयाच्या वरील तीन विभागाच्या वतीने या शैक्षणिक वर्षातील २५ विद्यार्थी घेऊन छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या वेरूळ येथील कैलास लेणी, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या घृष्णेश्वर मंदिर, यादव राजवट काळातील दौलताबाद येथील किल्ला, छत्रपती संभाजीनगर येथील औरंगजेबाच्या पत्नीच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेला बीबी का मकबरा आदी पर्यटन स्थळाचा ऐतिहासिक अभ्यास करून तत्काली राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती व वैशिष्ट्ये अभ्यासण्यात आली. प्राचीन भारतीय राजकीय वारसा आणि आजच्या राजकीय वातावरणाचा तुलनात्मक अभ्यासदेखील यावेळी विद्यार्थ्यांनी केला.

## शेतकऱ्यांसाठी न्यायालय व रस्त्यावरील संघर्ष सुरूच ठेवणार - ॲड. अजित काळे

**सोनपेठ ,/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण न्यायालयीन लढ्यासोबतच रस्त्यावरील संघर्षही सुरुच ठेवणार असल्याची ग्वाही जेष्ठ विधिज्ञ शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी दिली.

२०२० मधील पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा व्हावी यासाठी परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने उच्च न्यायालयात निःशुल्क दावा लढवुन त्यांना शेकडो कोटी रुपये व्याजासह मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणारे छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञ शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांचा परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा व शेतकरी हक्क परिषदेचे आयोजन शेळगाव महाविष्णू येथे करण्यात आले होते. यावेळी सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालीदास आपेट होते, तर सुधीर बिंदु, अमृत शिंदे, बंडू सोळंके, दगडूबा वजीर, इरशाद चाँद पाशा, किरण चक्रपाणी, शिवाजी बोबडे, अनंत काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्ह्यातील अनेक शेतकरी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने लढा देत पिक विमा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या ॲड. अजित काळे यांच्या कार्याचा जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. अजित काळे म्हणाले की, न्यायव्यवस्था कागदोपत्री प्रक्रियेवर चालत असली तरी सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पिक विमा हा शेतकऱ्यांवर कोणताही उपकार नसून तो केंद्र व राज्य शासनाचे कर्तव्य आहे. महाराष्ट्रातील पिक विमा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून मंत्री, अधिकारी व कर्मचारी यांची घरे भरली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. शासनाच्या योजना समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचतात की नाही, यावर लक्ष ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण झाली नाही, हे दुर्दैव असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेतकरी संघटित नसल्यामुळे अनेक प्रश्न दुर्लक्षित राहतात. धाडसाने प्रश्न विचारणे आणि हक्कासाठी आवाज उठवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण न्यायालयीन लढ्यासोबतच रस्त्यावरील संघर्ष ही सुरुच ठेवणार असल्याची ग्वाही त्यांनी सत्काराला उत्तर देताना दिली. शेतकऱ्यांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपल्या प्रश्नांसाठी एकत्र येणे आवश्यक असल्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात शेतकरी चळवळीतील हेमचंद्र शिंदे, विश्वंभर गोरवे व कालीदास आपेट यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अवधुत गिरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेळगाव येथील ग्रामस्थांनी परीश्रम घेतले.

## अग्रलेख...

# नेपाळमधील सत्तांतराचा नवा अध्याय

शिक्षण, रोजगार, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक शासन याबाबतच्या अपेक्षा नव्या पिढीत तीव्र आहेत. त्यामुळे भविष्यात राजकीय बदल घडवून आणण्यात युवकांची भूमिका अधिक निर्णायक ठरू शकते, हा नेपाळमधील नव्या सत्तांतर पर्वाचा धडा आहे. गेल्या अनेक दशकांत नेपाळमधील घडामोडींमुळे दक्षिण आशियातील राजकारणात अनेकदा अनपेक्षित वळणे घेतली आहेत. राजेशाहीचा अंत, प्रजासत्ताकाची स्थापना, माओवादी आंदोलन आणि वारंवार होणारी सत्ताबदलाची राजकीय अस्थिरता या सर्व टप्प्यांतून जात असताना नेपाळमध्ये घडलेल्या नव्या सत्तांतरातून पुन्हा एकदा नव्या प्रकारच्या राजकीय प्रयोगाचा प्रारंभ दिसू लागला आहे. नव्या वर्षात पहिल्या तिमाहीतच नेपाळमध्ये घडलेले सत्तांतर हा केवळ तेथील सत्तापालट किंवा सरकारमधील बदल नाही; तर नव्या पिढीच्या प्रगल्भ जाणिवा, समस्या आणि गरजांविषयीची जागृती व या पिढीच्या राजकीय हस्तक्षेपाचे प्रतीक म्हणून त्याकडे पाहावयास हवे. आजच्या तरुण पिढीने या जाणिवांचे दर्शन केवळ नेपाळमध्येच घडविलेले आहे असे नाही. 'जेन-झी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पिढीच्या आंदोलनांमुळे जगातील अनेक देशांच्या राजकारणाला आणि सत्ताकारणाला वेगळ्या दिशा मिळाल्याचे अलिकडील काही देशांतील तरुणांच्या आंदोलने आणि आक्रमक राजकीय अपेक्षांतून पाहावयास मिळाले आहे. त्यातूनच नेपाळमधील प्रस्थापितांच्या पठडीबाज राजकारणाची सद्दी संपली आणि नवी राजकीय समीकरणे उदयास आली. नेपाळमध्ये जे घडले, तो केवळ नेपाळच्याच नव्हे, तर दक्षिण आशियातील राजकारणासाठी महत्त्वाचा संकेत मानला जात आहे.

नेपाळमधील पारंपरिक राजकारण दीर्घकाळ काही ठरावीक पक्ष आणि नेत्यांभोवती फिरत राहिले. माओवादी, कम्युनिस्ट आणि काँग्रेस या प्रमुख राजकीय शक्तींमध्येच सत्तेचा खांदेपालट होत राहिला, परंतु सामान्य नागरिकांच्या जीवनात फारसा बदल दिसत नव्हता. भ्रष्टाचाराच्या आरोपांची मालिका, आर्थिक अडचणी, बेरोजगारी आणि रोजगाराच्या शोधात परदेशांत होणारे मोठ्या प्रमाणातील स्थलांतर यामुळे युवकांमध्ये असंतोष वाढत होता. शिक्षण घेऊनही देशात रोजगाराच्या मर्यादित संधी, आणि राजकीय घराणेशाहीमुळे नव्या नेतृत्वाला संधी न मिळणे या कारणांनी तरुणांचा पारंपरिक राजकारणावरील विश्वास कमी होत गेला, त्याचा परिणाम म्हणून या सत्तापालटाकडे पाहावे लागेल. समस्यांच्या संघर्षात भरडलेल्या तरुणाईच्या या असंतोषाची ठिणगी गेल्या वर्षअखेरच्या काही महिन्यांतच पडली होती. सरकारने काही सामाजिक माध्यमांवर निर्बंध लावण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये आणि तरुणांमध्ये संतापाची लाट उसळली. इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांवर पोसलेल्या आणि त्यावरच मुख्यतः विसंबून असलेल्या पिढीसाठी हा प्रशासकीय निर्णय केवळ तांत्रिक प्रश्न न राहता, तो अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादांचा प्रश्न बनला. देशभर विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि स्वतंत्र कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. विशेष म्हणजे, या आंदोलनामागे पारंपरिक राजकीय पक्षांचे नेतृत्व नव्हते. सामाजिक माध्यमांवरूनच आंदोलनाची आखणी होत गेली आणि हजारो तरुण स्वयंस्फूर्तीने यामध्ये सहभागी झाले. पुढे काही दिवसांतच ते उग्र झाले आणि सरकारविरोधी वातावरण तापत गेल्याने नेपाळी सत्तेवरील राजकीय दबाव वाढत गेला. के. पी. शर्मा ओली यांच्या सरकारला या आंदोलनांचा मोठा राजकीय धक्का बसला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे स्पष्ट झाल्यावर त्यांना पद सोडावे लागले. त्यानंतर अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले आणि नव्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. नव्या पिढीच्या नेतृत्वाला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हे या निवडणुकीचे वेगळेपण ठरले आणि रॅप गायकीकडून राजकारणात दाखल झालेले बालेंद्र शहा यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी या जेमतेम चार वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या पक्षाला ऐतिहासिक बहुमत देऊन नेपाळी जनतेने सत्तापालट घडविला. पारंपरिक राजकीय पक्षांच्या तुलनेत अधिक पारदर्शक आणि भ्रष्टाचारविरोधी प्रतिमा असलेल्या या नेतृत्वाला मिळालेला युवकांचा मोठा पाठिंबा हेदेखील या निवडणुकीतील जेन-झी च्या जागृत जाणिवांचे संकेत म्हणावे लागतील. कारण, इंटरनेट, समाजमाध्यमे आणि जागतिक माहिती प्रवाहाच्या वातावरणात वाढलेल्या जेन-झी पिढीचा या संपूर्ण प्रक्रियेतील सहभाग विशेष लक्षवेधी ठरतो. आजच्या प्रगत माहिती युगातील तरुण नागरिक केवळ प्रेक्षक राहिलेले नसून ते राजकीय प्रक्रियेचे सक्रिय सहभागी घटक होऊ पाहात आहेत. त्यांच्या अपेक्षा, त्यांच्या प्रश्न आणि त्यांच्या आकांक्षा या कोणत्याही लोकशाहीच्या भवितव्याला आकार देऊ शकतात, हा संदेशही या निकालाने जगाला दिला आहे. म्हणूनच केवळ भारताशेजारच्या एका देशातील राजकीय घटना एवढ्याच दृष्टीने या सत्तांतराकडे न पाहता, जागतिक पटलावरील बदलत्या सामाजिक-राजकीय वास्तवाचे संकेत देणारी घटना म्हणून या सत्ताबदलाची दखल घ्यावी लागेल.

अर्थात, आंदोलनातून उभे राहिलेले नेतृत्व सत्तेत आल्यानंतर त्यांच्यासमोरही अनेक कठीण आव्हाने उभी असतात. एक तर, अशा सत्ताधाऱ्यांकडून जनतेच्या अपेक्षा अधिक उंचावलेल्या असतात. आर्थिक संकट, प्रशासनातील जुनी व्यवस्था आणि शेजारील मोठ्या देशांशी संतुलित परराष्ट्र धोरण राखणे अशा अनेक या सर्व प्रश्नांना या नवख्या सत्ताधीशांस सामोरे जावे लागणार असते. युवकांच्या अपेक्षा खूप मोठ्या असल्याने त्या पूर्ण करण्यात अपयश आले तर नव्या नेतृत्वालाही तीव्र जनआक्रोशाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे, नेपाळमधील सत्तांतर हे राजकीय व्यवस्थेतील पिढीबदलाचे प्रतीक असले आणि आंदोलनातून राजकीय परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता नव्या पिढीत आहे, हे या घटनाक्रमाने सिद्ध केले असले, तरी आता सत्तेच्या राजकारणात या बदलाचा प्रभाव किती टिकून राहतो, याची अग्निपरीक्षा नव्या सरकारला पार पाडावी लागणार आहे. दक्षिण आशियातील राजकारणाच्या पुढील वाटचालीत या घटनेचे परिणाम दूरगामी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. या निवडणुकीत बालेंद्र शहा यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने निर्णायक बहुमत मिळविले आहे आणि माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या पक्षाला जेमतेम जागांवर विजयाची संधी देऊन त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. आता शहा यांच्या नव्या नेतृत्वाला नव्या पिढीच्या अपेक्षांची पूर्तता करण्याकरिता तातडीने काही धोरणात्मक कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. २७५ सदस्यांच्या सभागृहात बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील पक्षास दोन तृतीयांश बहुमत मिळण्याची स्पष्ट चिन्हे म्हणजे शहा सरकारवरील जनतेच्या या अपेक्षांचे नवे ओझे आहे. कारण या विजयामध्ये जवळपास दहा लाख नवमतदारांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

त्यातच, सरकार चालविण्याच्या राजकारणात शहा अगदीच नवखेदेखील आहेत. काठमांडूचे महापौरपद आणि अस्थिर आर्थिक संकटात सापडलेल्या देशाचे नेतृत्व यांमधील अनुभवांतही मोठे अंतर असते. नेपाळच्या डळमळत्या अर्थव्यवस्थेचा डोलारा पूर्वपदावर आणणे आणि शेजारी राष्ट्रांसोबतच्या नात्याची पुनर्बांधणी करणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, आरोग्य सुविधा सुदृढ करणे अशी अनेक नवी आव्हाने नेपाळच्या नव्या सत्ताधीशांसमोर आहेत. भारत आणि चीन या भारतीय उपखंडातील दोन प्रबळ सत्तांमधील संरक्षक पट्टी म्हणून नेपाळमधील राजकीय घडामोडी संवेदनशील असल्याने, या सत्ताबदलाचे भारतीय उपखंडातील भूराजकीय परिणाम दक्षिण आशियाच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही कळीचे मुद्दे ठरतात. कारण, आजच्या समस्याग्रस्त नेपाळचा भारत हा सर्वांत मोठा विकास भागीदार आहे. आरोग्य, शिक्षण, जलशक्तीसारख्या अनेक प्रकल्पांत भारताची नेपाळमध्ये गुंतवणूक होत आहे. सत्ताबदलाच्या पर्वात या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत अडथळे आले, तर नेपाळी जनतेच्या नव्या सरकारकडून असलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्याची परीक्षा अवघड ठरू शकते.

## आंतरराष्ट्रीय

# 'नेट-झीरो' आणि डिजिटल क्रांतीचे योगदान

**प्रा. जयसिंग यादव**

'नेट-झीरो' म्हणजे वातावरणात सोडल्या जाणाऱ्या हरितगृह वायूंचे प्रमाण आणि ते शोषून घेण्याचे प्रमाण यामध्ये संतुलन साधणे. म्हणजेच जितके उत्सर्जन होते, तितकेच कार्बन शोषून घेण्याची व्यवस्था निर्माण करणे. यासाठी दोन मार्ग महत्त्वाचे मानले जातात. पहिला म्हणजे कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी करणे आणि दुसरा म्हणजे जंगलवाढ, कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान किंवा इतर नैसर्गिक प्रक्रियांद्वारे उत्सर्जित कार्बन शोषून घेणे. या संकल्पनेला जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यामागे पॅरिस हवामान करार हा महत्त्वाचा टप्पा ठरला. २०१५ मध्ये झालेल्या या करारानुसार जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसच्या मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. ते साध्य करण्यासाठी शतकाच्या मध्यापर्यंत जगाने 'नेट-झीरो' उत्सर्जन गाठणे आवश्यक असल्याचे वैज्ञानिकांनी स्पष्ट केले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हवामानबदलाचे परिणाम जगभरात स्पष्टपणे दिसू लागले आहेत. युरोपमध्ये उष्णतेच्या लाटा, अमेरिकेत चक्रीवादळे, आफ्रिकेत दुष्काळ, आशियामध्ये पूर आणि जंगलातील आगी यासारख्या घटनांनी हवामानबदलाचे भीषण रूप उघड केले आहे. समुद्रपातळी वाढल्यामुळे किनाऱ्यावरील काही राष्ट्रांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कृषी उत्पादनावरही हवामानबदलाचा मोठा परिणाम होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर येत्या काही दशकांमध्ये जगासमोर अन्नटंचाई, पाण्याची कमतरता आणि पर्यावरणीय स्थलांतर यासारखी गंभीर संकटे उभी राहू शकतात. त्यामुळेच 'नेट-झीरो'चे ध्येय आता पर्यावरणीय प्रश्नापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याशीही थेट जोडले गेले आहे.

'नेट-झीरो'च्या प्रवासात विकसित देशांची भूमिका निर्णायक मानली जाते. कारण औद्योगिक क्रांतीपासून आजपर्यंतच्या एकूण कार्बन उत्सर्जनात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. अमेरिका, युरोपीय महासंघ, जपान आणि कॅनडा यांच्यासारख्या देशांनी २०५० पर्यंत 'नेट-झीरो' साध्य करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. युरोपीय महासंघाने हरित ऊर्जा, स्वच्छ वाहतूक आणि ऊर्जा कार्यक्षमतेवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक सुरू केली आहे. 'ग्रीन डील' धोरणांतर्गत उद्योग, शेती आणि शहरी विकासात मोठे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेतही अक्षय ऊर्जेच्या विस्ताराला चालना देणारी धोरणे राबवली जात आहेत. सौर आणि पवन ऊर्जेच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक वाढत असून इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे; मात्र विकसित देशांवर अजूनही टीका होत असते की त्यांनी ऐतिहासिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर उत्सर्जन केले असूनही विकसनशील देशांना आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक मदत पुरेशी दिलेली नाही. विकसनशील देशांसाठी 'नेट-झीरो'चा प्रवास अधिक गुंतागुंतीचा आहे. कारण या देशांमध्ये आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि गरिबी निर्मूलन या प्राथमिक गरजा अजूनही महत्त्वाच्या आहेत. उद्योग, ऊर्जा आणि वाहतूक क्षेत्राचा विस्तार करताना उत्सर्जन कमी ठेवणे हे मोठे आव्हान आहे. भारत, चीन, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यासारख्या देशांनीही 'नेट-झीरो'ची उद्दिष्टे जाहीर केली आहेत.

चीनने २०६० पर्यंत 'नेट-झीरो' साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, तर भारताने २०७० पर्यंत 'नेट-झीरो' गाठण्याची घोषणा केली आहे. या देशांनी अक्षय ऊर्जेचा विस्तार, ऊर्जा कार्यक्षमता आणि हरित तंत्रज्ञानाचा वापर यावर भर दिला आहे; परंतु या परिवर्तनासाठी प्रचंड गुंतवणूक आवश्यक आहे. त्यामुळे विकसनशील देश वारंवार सांगतात, की विकसित देशांनी हवामान वित्तपुरवठा आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यामध्ये अधिक उदार भूमिका घ्यावी. जागतिक कार्बन उत्सर्जनात सर्वाधिक वाटा ऊर्जा क्षेत्राचा आहे. कोळसा, तेल आणि वायू यासारख्या जीवाश्म इंधनांवर आधारित ऊर्जा प्रणालीमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर कार्बन सोडला जातो. त्यामुळे 'नेट-झीरो'च्या दिशेने वाटचाल करताना ऊर्जा संक्रमण अत्यंत महत्त्वाचे ठरते. सौर, पवन, जलविद्युत आणि हरित हायड्रोजन यासारख्या अक्षय ऊर्जेच्या स्रोतांना प्रोत्साहन देणे, हा या संक्रमणाचा मुख्य भाग आहे. अनेक देशांमध्ये सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प वेगाने वाढत आहेत. ऊर्जा साठवण तंत्रज्ञान, 'स्मार्ट ग्रीड' आणि डिजिटल व्यवस्थापन यामुळे ऊर्जा प्रणाली अधिक कार्यक्षम आणि स्थिर बनत आहे. भारतासारख्या देशांमध्ये सौरऊर्जेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. मोठ्या सौर पार्क प्रकल्पांमुळे आणि घरगुती सौर प्रणालींमुळे ऊर्जा क्षेत्रात नवे परिवर्तन घडत आहे. ऊर्जा क्षेत्राबरोबरच स्टील, सिमेंट, रसायन आणि वाहतूक यासारख्या क्षेत्रांमध्ये उत्सर्जन कमी करणे कठीण मानले जाते. या उद्योगांमध्ये उच्च तापमान प्रक्रिया आणि जीवाश्म इंधनांवर आधारित उत्पादन पद्धती वापरल्या जातात. या क्षेत्रांमध्ये कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान यांचा वापर वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आज अनेक उद्योग आपली उत्पादन प्रक्रिया अधिक स्वच्छ करण्यासाठी संशोधन आणि नवकल्पनांवर भर देत आहेत. 'नेट-झीरो'च्या प्रवासात तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. डिजिटलायझेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि डेटा विश्लेषण यासारख्या साधनांमुळे ऊर्जा वापर अधिक कार्यक्षम बनवणे शक्य होत आहे. स्मार्ट ग्रीड, स्वयंचलित इमारती आणि डिजिटल मॉनिटरिंग प्रणालीमुळे उत्सर्जन कमी करण्यास मदत मिळते. तसेच कार्बन कॅप्चर आणि स्टोरेज, हरित हायड्रोजन उत्पादन आणि प्रगत बॅटरी तंत्रज्ञान यासारख्या नव्या तांत्रिक उपाययोजना भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. 'नेट-झीरो' हा केवळ पर्यावरण संरक्षणाचा कार्यक्रम नाही, तर तो हरित अर्थव्यवस्थेचा नवा मार्गही आहे. अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा कार्यक्षम इमारती आणि हरित उद्योग यामुळे लाखो नवे रोजगार निर्माण होऊ शकतात. अनेक देश या परिवर्तनाकडे आर्थिक विकासाची संधी म्हणून पाहत आहेत. हरित तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढल्यामुळे उद्योग आणि संशोधन क्षेत्राला नवे प्रोत्साहन मिळत आहे. 'नेट-झीरो' हा प्रश्न जागतिक स्वरूपाचा असल्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यावश्यक आहे. हवामान वित्तपुरवठा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सामायिक संशोधन यामुळेच जागतिक स्तरावर परिणामकारक बदल घडू शकतो. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदांमध्ये या विषयावर सातत्याने चर्चा होत आहे; मात्र अनेक वेळा विकसित आणि विकसनशील देशांमधील मतभेदामुळे निर्णय प्रक्रियेत अडथळे येतात.

भारत जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. त्यामुळे ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत, तरीही भारताने अक्षय ऊर्जेच्या विस्तारावर भर देत हरित विकासाचा मार्ग स्वीकारला आहे. सौर ऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहने, हरित हायड्रोजन मिशन आणि ऊर्जा कार्यक्षमतेच्या योजना यामुळे भारत 'नेट-झीरो'च्या दिशेने महत्त्वाची पावले उचलत आहे. त्याचबरोबर भारताने जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय सौर आघाडीसारख्या उपक्रमांद्वारे सहकार्यालाही चालना दिली आहे. 'नेट-झीरो'च्या प्रवासात अजून अनेक अडथळे आहेत. अक्षय ऊर्जा प्रकल्पांसाठी जमीन, गुंतवणूक आणि तांत्रिक क्षमता यासारख्या समस्या अनेक देशांसमोर आहेत. तसेच ऊर्जा संक्रमणामुळे पारंपरिक उद्योगांमध्ये रोजगाराचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. याशिवाय हवामान वित्तपुरवठ्याच्या प्रश्नावर विकसित आणि विकसनशील देशांमध्ये मतभेद कायम आहेत. त्यामुळे जागतिक सहकार्य अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर 'नेट-झीरो' उत्सर्जनाकडे वाटचाल हा केवळ पर्यावरणीय कार्यक्रम नाही, तर मानवजातीच्या भविष्याशी निगडित असलेले ऐतिहासिक परिवर्तन आहे. हवामानबदलाचे संकट टाळण्यासाठी आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारण्यासाठी हा बदल अपरिहार्य ठरतो. ऊर्जा संक्रमण, तांत्रिक नवकल्पना, धोरणात्मक सहकार्य आणि आर्थिक गुंतवणूक यांच्या साह्यानेच हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. जगातील सर्व देशांनी एकत्रितपणे प्रयत्न केले, तरच पृथ्वीचे पर्यावरण संतुलित राखणे शक्य होईल. 'नेट-झीरो'च्या दिशेने सुरू झालेली ही जागतिक वाटचाल अजूनही दीर्घ आणि आव्हानात्मक आहे; परंतु शाश्वत भविष्याची आशा जिवंत ठेवणारा हा एकमेव मार्ग असल्याचे आज सर्वांनाच मान्य करावे लागेल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# भारताच्या शक्तीची चीनलाही जाणीव

आपल्या विस्तारवादी मानसिकतेसाठी चीनची संपूर्ण जगाला ओळख आहे. गरीब आणि असहायतेचा फायदा घेऊन चीनने अनेक देशांना आपल्या जाळ्यामध्ये ओढले आहे. त्यामुळे संपूर्ण जगामध्ये कटकारस्थान करून आपला स्वार्थ साधणारा देश म्हणून त्याची ओळख निर्माण झाली आहे. याबाबत भारत अतिशय सावधगिरीने पावले उचलून वाटचाल करीत असला, तरीही भविष्यामध्ये निर्माण होणाऱ्या घडामोडींबाबत डोळ्यात तेल घालून दक्ष राहण्याची गरज आहे. २०१४ नंतर उदयास आलेल्या नव्या भारताची ओळख चीनला नक्कीच झाली आहे. त्यामुळे ताकही फुंकून पिण्याच्या मानसिकतेमध्ये सध्या चीन वावरत आहे. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर २०१४ पर्यंत चीन भारतावर सतत कुरघोडी करीत राहिला. येथील सत्ताधारी हे सर्व आपल्या उघड्या डोळ्यांनी बघत राहिले. काँग्रेस पक्षाने अनेकदा देशहित बाजूला सारून आपल्या वैयक्तिक गरजांना प्राधान्य दिले. परंतु, डोकलाम आणि गलवान घाटीच्या घटनेने चीनला नरेंद्र मोदीच्या नव्या भारताची खरी ओळख झाली. आकाशालाही गवसणी घालण्याची ताकद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक आव्हानांना सामोरे जात निर्माण केली.

भारतीय संस्कृती आणि परंपरेची यावेळी खऱ्या अर्थाने जगाला ओळख झाली. त्यामुळे शक्तिशाली भारतसोबत मैत्रीचे नवे पर्व सुरू व्हावे यासाठी चीनने आटापिटा सुरू केला आहे. भारत आणि चीनने एकमेकांकडे प्रतिस्पर्धी नव्हे, तर भागीदार आणि धोक्याऐवजी संधी म्हणून बघितले पाहिजे, असे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांचे वक्तव्य म्हणजे संपूर्ण जगाला नव्या शक्तिशाली भारताची ओळख करून देणारे आहे. एका शक्तिशाली आणि शक्तिसंपन्न शेजारी देशाशी पूर्वीची सर्व कटुता विसरून भागीदार म्हणून जर चीन भारताकडे बघत असेल, तर चीनलाही भारताच्या शक्तीची, स्वाभिमानाची ओळख पटली आहे, हे दिसून येते.



या देशावर जवळपास ६० वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेस पक्षाने देशाला शक्तिसंपन्न करण्याऐवजी घराणेशाहीच्या संपन्नतेलाच अधिक महत्त्व दिले. काँग्रेसच्या या माानसिकतेची जबर किंमत देशाला मोजावी लागली. त्याचे चटके अजूनही आम्हाला बसत आहेत. काँग्रेस पक्षाने लाडावून ठेवलेला पाकिस्तान एका झटक्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरळ केला. हाती कटोरा घेऊन जगभर फिरण्यास त्याला बाध्य केले. संपूर्ण जगाला त्यांनी खऱ्या भारताची ओळख करून दिली. अमेरिका आणि चीन हे दोन देश नेहमीच एकमेकांना पाण्यात बघणारे. त्यामुळे शक्तिशाली भारत आपला मित्र असावा असे चीनला वाटणे स्वाभाविक आहे. परंतु, पाठीमध्ये खंजीर खुपसण्याची चीनची वृत्तीही आम्ही कायम स्मरणात ठेवली पाहिजे. चीनचे विस्तारवादी धोरण हे शेजारी राष्ट्राच्या जमिनीवर दावा करणे, लष्करी ताकद वाढविणे आणि त्या देशास आपल्या आर्थिक जाळ्यामध्ये ओढून त्यांचा भूभाग काबीज करणे यावरच आधारित आहे. चीनने केवळ भारताचाच नव्हे तर आपल्या जवळच्या जवळपास २३ देशांच्या भूभागावर दावा केला आहे. नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान, मालदीव यासारख्या अनेक लहान देशांना भरमसाट कर्ज देऊन चीनने या देशांना आपले बटिक बनविले आहे. त्यामुळे भविष्यामध्ये चीनचा या देशाशी व्यवहार कसा असेल, हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. चीनचा हा कावेबाजपणा जगानेही ओखला आहे. दुसरीकडे भारताने कोणत्याही अन्य देशाचा भूभाग बळकावण्याचा प्रयत्न तर दूर तसा साधा विचारही कधी केला नाही. हे विश्वचि माझे घर अशा उदात्त वृत्तीचे भारतीय आम्ही. त्यास अधिक ठळकपणे नरेंद्र मोंदींनी जगासमोर मांडले आहे. संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी झटणारा भारत अशी ठाम ओळख मोंदींनी जगामध्ये निर्माण केली आहे. त्यामुळे जगामधील कितीतरी देश भातरामध्ये आपले भविष्य शोधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. नरेंद्र मोदींची घोडदौड अशीच सुरू राहिली तर आपले काही खरे नाही, या नैराश्याने काँग्रेस ग्रासली असून, काँग्रेस बेताल आणि भयभीत झाली आहे. भारताच्या बदनामीचे षडयंत्र रचण्यात काँग्रेस आपला वेळ घालवीत आहे. विदेशामध्येही आपल्या देशाची बदनामी करीत आहे. शत्रू घरामधील असो की, बाहेरचा नरेंद्र मोदी हे चांगलेच ओळखून आहे.

९८८१७१७८५६

## कानोसा

# विकसित भारतासाठी महिलांचे योगदान

**अमोल पुसदकर**

आईच्या नावावरून तिच्या पराक्रमी पुत्रांची ओळख प्राचीन काळापासून केली जात होती. कौशल्या नंदन राम, देवकीनंदन वासुदेव कृष्ण, कौंतेय अर्जुन, राधेय कर्ण आणि शालिवाहन राजघराण्यातील राजा सातकर्णी हा स्वतःची ओळख गौतमीपुत्र सातकर्णी अशी करून द्यायचा. आमची संस्कृती ही मातृपूजकच आहे. माहूरला आईचे श्राद्ध जिथे करतात. त्या तीर्थाचे नाव सुद्धा मातृतीर्थ आहे. संतांची, महापुरुषांची, देवतांची, पराक्रमी पुरुषांची अशी अनेक उदाहरणे आपल्या ग्रंथांमध्ये ठिकठिकाणी आपल्याला आढळून येतील. नुकताच जागतिक महिला दिन साजरा झालेला आहे. जगाला समानतेचे पाठ देणारे अमेरिका आणि युरोप या देशांमध्ये महिलांना समानतेचे अधिकार नव्हते. कामाचे तास, कामाच्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा या सुद्धा एकेकाळी नव्हत्या. त्या विरोधात महिला रस्त्यावर उतरल्या आणि त्यातून त्यांनी बदल घडवून आणले. याची स्मृती म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी महिला दिन साजरे केले जाऊ लागले आणि मग याला एके दिवशी जागतिक स्वरूप प्राप्त झाले.

जगामध्ये महिला हक्कांच्या या गोष्टी ज्या वेळेला घडत होत्या, त्याच्या अनेक वर्ष आधी भारतामध्ये ''मेरी झांसी नहीं दूंगी'' असे म्हणत एक तरुण मुलगी इंग्रजांच्या विरोधामध्ये आपल्या प्रजेच्या आणि राज्याच्या रक्षणार्थ उभी ठाकली होती. ती झाशीची राणी लक्ष्मीबाई होती. तिच्या महिला तुकडीचे नेतृत्व करणारी झलकारी बाई ही महिला सेनानी होती. आमच्या देशाला राणी लक्ष्मीबाई, राणी दुर्गावती, राणी चन्नम्मा, आझाद हिंद सेनेची महिला सेनापती कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन माहीत आहेत. ज्यावेळेस महिला अमेरिकेमध्ये हक्कांसाठी लढत होत्या, त्यावेळेला प्रीतिलता वड्डेदार, शांती घोष, दुर्गा भाभी यासारख्या महिला भारतीय स्वातंत्र्यासाठी लढत होत्या. त्यामुळे जागतिक महिला दिवस हाच केवळ भारतीय महिलांसाठी दिशादर्शक नाही. तरीसुद्धा जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांची समाजातील सद्यःस्थिती, त्यांच्यासमोरील आव्हाने, विकासासाठी खुणावणारी क्षेत्रे व आगामी काळात विकसित भारतासाठी त्यांचे योगदान या सर्वच बाबींवर विचार करण्याची आवश्यकता आहे. महिला म्हटलं की आपल्यासमोर सगळ्यात पहिले जर कोणती गोष्ट उभी राहत असेल, तर ती म्हणजे कुटुंब. मुलांचे संगोपन, मुलांना संस्कार देणारी आई, घरातील तिची पत्नी, आई, बहीण आणि सून अशा विविध रूपांतील भूमिका. या भूमिकांचा शेकडो वर्षांपासून कुटुंब व्यवस्थेला खूप मोठा आधार मिळत राहिलेला आहे. या सर्व भूमिकांनी कुटुंबाला नेहमीच सावरून धरलेलं होतं.



काळ बदलत गेला. शिक्षण, नोकरी, करीअर, समाजात चालणारे विविध स्त्रीमुक्तीचे प्रवाह, या सर्वच गोष्टींचा परिणाम या भूमिकांवर होत गेलेला आहे. मागच्या तीस वर्षांत खूप मोठे सामाजिक बदल कुटुंब व्यवस्थेमध्ये बघायला मिळालेले आहेत. तीस वर्षांपूर्वी या सर्व भूमिका कायम ठेवत स्त्रियांनी शिक्षण, नोकरी, व्यावसायिक कारकीर्द, सामाजिक कार्य या सर्वच क्षेत्रांमध्ये प्रवेश केला. त्यांनाही या सर्वच क्षेत्रांमध्ये प्रवेश करण्यासाठी, कायम राहण्यासाठी, प्रगती करण्यासाठी संघर्ष करावा लागला. या संघर्षातून वेळेचे व्यवस्थापन हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला. घरात आणि घराबाहेर वठविलेल्या भूमिकांमुळे साहजिकच परिश्रम वाढले व थकवा सुद्धा येऊ लागला. हळूहळू यातील काही भूमिकांना दिला जाणारा न्याय कमी होत गेला. आपण आपल्या भूमिकांना न्याय देऊ शकत नाही, यामुळे मानसिक संघर्ष सुद्धा निर्माण झाले. कौटुंबिक वाद सुद्धा निर्माण झाले.

२०४७ हे स्वातंत्र्याचे शंभरावे वर्ष आहे. या वर्षापर्यंत भारत खऱ्या अर्थाने कसा विकसित राहील, याचा विचार करणे आवश्यक आहे. महिलांची यामध्ये मोठी भूमिका राहणार आहे. १९४७ मध्ये समाजामध्ये एकत्र कुटुंब पद्धती होती. ७५ वर्षांमध्ये ती अति संकुचित झाली. मी, माझी बायको व माझा एखादा मुलगा किंवा मुलगी, इथपर्यंत कुटुंबाची व्याख्या आलेली आहे. आता ती त्याच्याही पुढे जाऊन मुलं नसलेली जोडपी इतकी समोर जाऊ पाहत आहे. त्यामध्ये आई-वडिलांचे स्थान कमी दिसत नाही. येणाऱ्या काळात यातून वृद्धाश्रम आणि ज्येष्ठ नागरिकांच्या मोठ्या समस्या निर्माण होतील. ज्यांनी आपले संपूर्ण जीवन आपल्या मुलाबाळांना सुख-सुविधा, उत्तम शिक्षण देण्याकरिता घालविले आहे, त्याच वृद्धांवर उद्या त्यांनीच उभ्या केलेल्या इमारतींमधून बाहेर निघून वृद्धाश्रमात राहण्याची वेळ येणे हे काही चांगल्या समाजाचे लक्षण नाही. भारतापेक्षा मोठी लोकसंख्या चीनची आहे, परंतु त्यांनी लोकसंख्येला आपली कमतरता बनू दिलेले नाही, तर त्यांनी शक्ती बनविलेले आहे. चीनमध्ये लोकसंख्येच्या ४९ टक्के महिला आहेत. त्यांचा सहभाग हा राष्ट्र उभारणीत मोठा आहे. चीनच्या कुटीर उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिलांचे स्थान आहे. उद्योगांमध्ये सुद्धा ज्या ठिकाणी महिलांच्या अंगभूत गुणांचा उपयोग आहे, अशा सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणावर महिला कामगार, महिला अधिकारी, महिला उद्योजक आहेत. भारतातही अनेक यशस्वी महिला आहेत, ज्यामध्ये बायो कॉन या औषधे क्षेत्रातील कंपनीच्या संस्थापक किरण मजुमदार, वयाच्या पन्नासाव्या वर्षी नायका ही ऑनलाईन सौंदर्यप्रसाधने आणि स्वास्थ्य उत्पादने विकणारी कंपनी स्थापन करणाऱ्या फाल्गुनी नायर, वंदना लुथरा यांची आरोग्य व सौंदर्यप्रसाधने निर्माण करणारी व्हीएलसीसी ही कंपनी आहे. उद्योगाबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये सुद्धा महिला चांगली कामगिरी नोंदवीत आहे. ज्यामध्ये ऋतू श्रीवास्तव या चांद्रयान दोन या मोहिमेच्या मिशन संचालक होत्या, तर मुथया वनिता या प्रोजेक्ट डायरेक्टर होत्या, तर कविता या चंद्रावर विक्रम लँडर उतरविण्याच्या योजनेच्या तांत्रिक प्रमुख होत्या. पूर्वीपासूनच महिलांनी या देशांमध्ये सनातन हिंदू धर्म टिकवून ठेवलेला आहे. तो भविष्यातही कसा टिकेल, आमच्या येणाऱ्या पिढीला सुद्धा आम्ही त्यातील जीवनमूल्ये कशी संक्रमित करू शकू, याचाही विचार होणे गरजेचे आहे. पूर्वी शाळांच्या भिंतीवर अनेक सुविचार लिहिलेले असायचे. यामध्ये ''विद्या विनयेन शोभते'' असे लिहिलेले असायचे. हा सुविचार मुला-मुलींना सर्वांनाच लागू आहे. सर्वांनीच त्याचे भान ठेवावे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### डोनाल्ड ट्रम्प जेम्स बाँडच्या भूमिकेत

युनोचा काही उपयोग आहे? हा सडेतोड अग्रलेख वाचला. इंग्रजी चित्रपटात जेम्स बाँड नावाच्या व्यक्तिरेखेला राईट टू कील हा अधिकार दिलेला असतो ज्यामध्ये त्याला कोणालाही, कधीही, कुठेही, कोणत्याही कारणाशिवाय गोळ्या घालून ठार करण्याचा अधिकार दिलेला असतो, असे सांगितले जाते. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे यानंतर जेम्स बाँडवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यास कायदेशीर मनाई होती. अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष सध्या जेम्स बाँडच्या भूमिकेत आलेले आहेत. परमेश्वराने त्यांना राईट टू अटॅक, राईट टू किडनॅप, राईट टू रुल, राईट टू इंटरव्हेन आणि राईट टू डिस्ट्रॉयसह जागतिक जेम्स बाँडची भूमिका प्रत्यक्षात निभावण्याची जबाबदारी दिलेली आहे. भारतात जशी नैतिकतेची सोल एजन्सी परमेश्वराने गांधी नेहरू परिवाराला आणि काँग्रेस पक्षाला दिली आहे, अगदी तशीच जबाबदारी डोनाल्ड ट्रम्पना मिळालेली आहे. अमेरिका फर्स्ट याचा, बाकी सगळे लास्ट असा सोयीस्कर अर्थ त्यांनी काढला आहे.

जगातील कोणत्या देशात कोणाचे सरकार हवे, कोणी कोणाकडून काय खरेदी करावे, कोणाला काय विकावे येथपासून ते कोणत्या देशाने कोणकोणत्या शस्त्रास्त्रांचा साठा करावा याचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार ट्रम्प यांनाच आहे. एखादा देश अमेरिकन हिताच्या आड येणार असेल तर पैशाच्या जोरावर तेथे गुंडांच्या आणि दहशतवाद्यांच्या मदतीने सरकार उलथवणे, हे उपद्व्याप ट्रम्प उघडपणे आणि डंके की चोटपर करत आहेत. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेने त्याची झळ सोसली आहे. इराक, इराण, अफगाणिस्तानच्या नागरिकांना ते भोगावे लागले आहे. इतके होऊनही युनो, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोग, संयुक्त राष्ट्र संघाची सुरक्षा परिषद अशा सर्व संस्था बापूंच्या तीन मर्कटांच्या भूमिकेत गेल्या आहेत. जगातील दहशतवादाचे उच्चाटन करण्याची दर्पोक्ती करणारे डोनाल्ड ट्रम्प, आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांसाठी नंदनवन असलेल्या, जगातील विविध देशांत दहशतवाद पसरवणाऱ्या आणि ओसामा बिन लादेनला आपल्या पंखाखाली घेणाऱ्या पाकिस्तानचे मात्र चोचले पुरवत आहेत. जगातील रशिया, चीन आणि युरोपीय देशांनी अमेरिकेच्या दादागिरीचा विरोध केला असला तरीही नजीकच्या काळात अमेरिकेचा दहशतवाद थांबण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### पर्यावरण जनजागृती

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्ती या विषयांवर जनजागृतीपर लेख प्रसिद्ध करावेत. तसेच या विषयांवर सातत्याने बातम्याही प्रसिद्ध कराव्यात. सामाजिक संघटनांच्या उपक्रमांनाही प्रसिद्धी द्यावी.

**भूषण जोशी**/पुणे

### स्थानिक बातम्यांना प्राधान्य हवे

जिल्हा व तालुका स्तरावरील बातम्यांना अधिक जागा द्यावी. ग्रामीण भागातील विषयांना सातत्याने प्रसिद्धी द्यावी. स्थानिक समस्या, विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केल्यास प्रशासन अधिक जबाबदार राहील. त्यातून आणखी वाचक जोडले जातील.

**रोशन निंबाळकर**/पुणे

### महिला विषयांवरील लेख

महिलांच्या आरोग्य, स्वावलंबन आणि सुरक्षिततेसंबंधी लेख अधिक प्रमाणात प्रकाशित व्हावेत. महिलांसाठी विशेष पान करता आले तर उत्तम होईल. ग्रामीण महिलांच्या यशोगाथा प्रसिद्ध केल्यास समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण होईल. त्यातून महिला सबलीकरण करता येईल.

**महेश थोरात**/पुणे

### शाळांमध्ये स्वच्छतागृह नसणे ही सरकारची नामुष्की

राज्यातल्या ६ हजार ९६४ शाळांमध्ये मुलींसाठी आणि दहा हजार १८९ शाळांमध्ये मुलांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याची कबुली शालेय शिक्षण मंत्र्यांनी विधानसभेत दिली. महाराष्ट्रातील शाळांमध्ये स्वच्छतागृह असणे हे फार महत्त्वाचे आहे आणि याकडे लक्ष देणे हे शिक्षण मंत्र्यांचे पहिले कर्तव्य आहे. शिक्षणमंत्र्यांनी खरोखर ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या ताबडतोब कराव्यात. शाळेतील मुलांसाठी प्रसाधनगृहे ही फारच आवश्यक असल्याने त्यांनी स्वतः वर्षभरात ही प्रसाधनगृहे बांधून पूर्ण करावीत. शिक्षणमंत्र्यांनी या गोष्टी प्रथम कराव्यात कारण आजची मुलं उद्या देशाची आधारस्तंभ आहेत.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बीडमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचा मोठा छापा; लाखो रुपयांचा गुटखा जप्त

## बशीरगंज भागातील पत्राच्या शेडवर कारवाई; एका आरोपीला अटक तर मुख्य सूत्रधार फरार

तभा. वृत्तसेवा

**बीड** | बीड जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. बशीरगंज भागातील एका पत्राच्या शेडमध्ये बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेला विविध कंपन्यांचा गुटखा पोलिसांनी जप्त केला असून, या कारवाईत साधारण दीड लाख रुपयांहून अधिक किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना गुप्त बातमीदाराकडून बशीरगंज येथील एका शेडमध्ये विक्रीसाठी गुटखा साठवून ठेवल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने दुपारी बाराच्या सुमारास छापा टाकला. या ठिकाणी आरोपी शेख इरफान जब्बार हा पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये गुटखा साठवून ठेवताना मिळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून एकूण एक लाख साठ हजार दोनशे चाळीस रुपयांचा माल जप्त केला आहे.

तपासात समोर आले आहे की, आरोपी शेख इरफान जब्बार हा फरार आरोपी सलमान रफिक बागवान याच्या सांगण्यावरून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हा साठा करत होता. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सदरची यशस्वी कामगिरी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली गोविंद राख, युनुस बागवान, अंकुश वरपे, स्वाती मुंडे, अशपाक सय्यद, मनोज परजणे, बबन सलगर आणि नितीन वडमारे यांच्या पथकाने केली आहे.

### अवैध गुटख्यावर धडक कारवाई

सव्वा लाखाचा माल जप्त

बीडमधील बशीरगंज परिसरात पोलिसांनी छापा टाकून मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा जप्त केला आहे. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून मुख्य आरोपी फरार आहे. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

बशीरगंज येथील पत्राच्या शेडवर पोलिसांनी टाकला छापा. कारवाईत एक लाख साठ हजार रुपयांचा विविध कंपन्यांचा गुटखा हस्तगत.

आरोपी शेख इरफान जब्बार याला घटनास्थळावरून अटक. मुख्य आरोपी सलमान रफिक बागवान अद्याप फरार, शोध सुरू.

# केजजवळ दोन कारची समोरासमोर धडक

तभा. वृत्तसेवा

**केज** | केजमांजरसुंबा महामार्गावर उमरी पाटीजवळ दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जण जखमी झाले. जखमींना पोलिसांच्या मदतीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



मंगळवारी (दि. १०) दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. रिलायन्स पवन ऊर्जा कंपनीत सुरक्षा रक्षकांचे सुपरवायझर म्हणून कार्यरत असलेले माजी सैनिक मधुकर बालासाहेब गायकवाड (रा. चिंचोली माळी, ता. केज) आणि त्यांचे सहकारी सिद्धेश्वर देवसन आदमाने (रा. बीड) हे स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच-४४ एस-७४३२) कारने बीडकडे जात होते.

त्याच वेळी बीडकडून केजकडे येणारी टाटा अल्ट्रॉस (क्र. एमएच-२३ बीएच-६५६६) कार यांच्यात केजमांजरसुंबा महामार्ग क्र. ५४८-डीवरील गंगामाऊली साखर कारखान्याजवळील कदमवाडी फाट्याजवळ, चंद्रकांत खरात यांच्या आदित्य बिअर बार अँड परमिट रूमसमोर समोरासमोर धडक झाली. या अपघातात टाटा अल्ट्रॉस कारमधील शिवराज रविंद्र माने, रवि संतराम शिंदे व अनिल आत्माराम मोरे हे तिघे तसेच स्विफ्ट डिझायर कारमधील मधुकर बालासाहेब गायकवाड व सिद्धेश्वर देवसन आदमाने हे दोघे जखमी झाले. अपघातात दोन्ही वाहनांतील शिवराज रविंद्र माने (वय ३३, रा. बीड), रवि संतराम शिंदे (वय ३३, रा. बीड), अनिल आत्माराम मोरे (वय ३२, रा. बीड) एकूण पाच जण जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशाने पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण, जमादार गित्ते, संतोष गित्ते, शिवाजी कागदे, तांबारे, रामहरी शिंदे, नितीन मेटे तसेच गृहरक्षक दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. म्ब्युलन्स चालक सुमित तेलंग यांच्या मदतीने जखमींना उपजिल्हा रुग्णालय, केज येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## संत आणि ग्रंथ हीच वारकरी संप्रदायाची खरी संपदा आणि अस्मिता आहे : ह. भ. प.अॅड.दत्तात्रय महाराज



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी )** | संत आणि ग्रंथ हीच वारकरी संप्रदायाची खरी संपदा आणि अस्मिता आहे असे प्रतिपादन संत वाङ्मयाचे संशोधक ह. भ. प.अॅड. दत्तात्रय महाराज आंधळे यांनी केले.

परळी वैजनाथ तालुक्यातील अत्यंत पवित्र असलेले व संत जगमित्र नागा यांच्या पावन पदस्पर्शाने पूनीत झालेले नंदागौळ या गावी, नाथ षष्ठी उत्सवसोहळ्या निमित्त कीर्तन आयोजित केले होते.

वारकरी संप्रदायामध्ये विपुल ग्रंथ निर्मिती करून संतानी आपणाला ग्रंथसंपदा दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी अमृत अनुभव, चांगदेव पासष्टी, तसेच अभंग गाथा दिली. संत नामदेव महाराज, संत चोखामेळा, संत जगमित्र नागा, गोरोबा काका, संत मुक्ताबाई, संत जनाबाई यांचेही योगदान आहे नंतरच्या कालखंडात संत तुकाराम महाराज आणि संत एकनाथ महाराजांनी वाङ्मयनिर्मिती करुन अलौकिक कार्य केलेले आहे.

यावेळी कीर्तनाला साथ संगत ह. भ. प. प्रकाश महाराज जगताप,जी. टी. टेलर तर मृदंगाची साथ ह भ प बैरागी महाराज यांनी दिली. प्रतिवार्षिक नाथषष्ठी उत्सव सोहळ्याचे आयोजन अॅड. सुभाष मारोती गित्ते हे करतात. यावर्षी ही मोठ्या प्रमाणावर या उत्सवाचे अत्यंत श्रध्देने आयोजन अॅड. सुभाष मारोती गित्ते आणि अॅड. शुभांगी सुभाष गित्ते यांनी केले.

# ब्रह्मकुमारीज सेवा केंद्रात महिलांचा सन्मान व सशक्तीकरणाचा प्रेरक संकल्प

### आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यक्रम

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | येथील प्रजापिता ब्रह्मकुमारीज सेवा केंद्र - अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा सन्मान व सशक्तीकरणाच्या प्रेरक संकल्पावर वाटचाल करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती राजयोगिनी ब्र. कु.सुनीता दिदी (संचालिका, अंबाजोगाई सेवा केंद्र, आनंद सरोवर) यांनी दिली आहे.




दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी प्रजापिता ब्रह्मकुमारीज सेवा केंद्र, आनंद सरोवर, वाघाळा रोड, अंबाजोगाई येथे नुकतेच शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शिका आ.राजयोगिनी ब्र. कु.सुनीता दिदी या होत्या. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती आश्विनी जिरंगे (अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई.) या होत्या, तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मिसेस महाराष्ट्र डॉ.सुनीता तोंडगे (मिसेस महाराष्ट्र-२०२५ किताबाच्या मानकरी), शिक्षणतज्ज्ञ सौ.स्वरूपा कुलकर्णी (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर), ब्युटीशियन सौ.स्मिता हिरळकर (संचालक, साक्षी ब्युटी पार्लर), उद्योजिका सौ.अलका देशपांडे (कलांगण, वस्त्रकला) आणि विधिज्ञ ॲड.एम.बी.धायगुडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये महिला सशक्तीकरणा सोबतच स्वावलंबन, आत्मनिर्भर, आत्मसन्मान याचे महत्व स्पष्ट करून महिलांची जनजागृती करण्यात आली. वंदेमातरम - स्वर्णिम भारताचे हे अभियान गतीने पुढे नेण्यासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारीज यांचे योगदान मोलाचे ठरत आहे. या योगदानात आध्यत्मिक आणि नैतिक मूल्यांची जपणूक करीत एक सुवर्ण राष्ट्र निर्माण करण्याची प्रेरणा व शक्ती स्त्रीयां मध्ये आहे असे महत्त्वपूर्ण विचार बी.के.सुनीता दीदी यांनी व्यक्त केले. तर स्त्रीयांचा सन्मान हा फक्त महिला दिनी नसून तो प्रत्येक क्षणी व्हावा अशी अपेक्षा कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती आश्विनी जिरंगे (अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई.) यांनी व्यक्त केली. यावेळी प्रमुख अतिथी यांचेकडून ही स्त्रीचे समाजजीवनातील महत्व, कार्य व योगदान याबाबत मौलिक असे विचार व्यक्त करण्यात आले. ओम शांती या शांती मंत्राने या महिला गौरव दिनाची सांगता करण्यात आली. प्रजापिता ब्रह्मकुमारीज सेवा केंद्र अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात अंबाजोगाई शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात नृत्य आविष्कार सादर केला, मेडिटेशन आणि समायोचित मार्गदर्शन लाभले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. तर सेवा केंद्राच्या वतीने मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार बी.के.मंजू दीदी यांनी मानले. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात २०० हून अधिक महिला, युवती, भगिनी सहभागी झाल्या होत्या.

# तिहेरी आनंदाचा महिला दिन स्कॉलर केजी स्कूलमध्ये साजरा!



तभा. वृत्तसेवा

**बीड** | स्वतःचा उत्कर्ष कसा करावा याचा संवाद साधणारा कार्यक्रम, पाककलेच्या कौशल्येला वाव देणारा आनंद नगरीचा कार्यक्रम आणि महिलांच्या आरोग्याला थोडासा हातभार लावणारा फ्री डेंटल चेकअप कॅम्प असा तिहेरी आनंदाचा महिला दिन स्कॉलर केजी स्कूलमध्ये उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ सुरेखा बांगर तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ रुपाली फड आणि प्रा वंदना जगतकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास उपस्थित महिलांमधून लकी ड्रॉ पद्धतीने व्यासपीठावर बसण्याची संधी सौ पूनम भुतडा यांना मिळाली. विद्येची देवता सरस्वती आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर उपस्थित पाहुण्यांचे स्वागत शाळेच्या शिक्षिका आणि फुटके परिवाराच्या वतीने करण्यात आले.

शाळेच्या प्राचार्या सौ सुजाता फुटके यांनी आपल्या प्रास्ताविकात यावर्षी पहिल्यांदाच आयोजित केलेल्या आनंद नगरी, फ्री डेंटल चेकअप कॅम्पचे आयोजन महिला दिनानिमित्ताने करताना आनंद होत असल्याचे सांगितले.

डॉ सौ रूपाली फड यांनी महिलांनी कुटुंब सांभाळत असताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याची सुचित केले.

डॉ सौ सुरेखा बांगर यांनी कर्तुत्ववान स्त्रियांची आठवण करून देत आपण कसे वागावे याचे उत्तम उदाहरण महिलांना दिले. त्यांचा हसत खेळत झालेला हा संवाद महिलांना खूप आवडला.

प्रा सौ वंदना जगतकर यांनी या आनंदनगरीचे परीक्षण केले. आपल्या मनोगतात त्यांनी सकस पौष्टिक आहाराचे महत्वही महिलांना सांगितले.

उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते आनंदनगरीचे तसेच फ्री डेंटल चेकअप कॅम्पचे उद्घाटन झाले आणि आनंद सोहळ्यास सुरुवात झाली. आरोग्यास पोषक आणि जिभेला सुखाविल अशा अनेक खमंग पदार्थांची मेजवानी उपस्थित महिलांना या ठिकाणी मिळाली. सुमारे दोन तासापेक्षा अधिक वेळ चाललेल्या या आनंदनगरीचा आस्वाद परिसरातील अनेक महिला, पुरुष तसेच बालगोपाळांनी घेतला.

प्रमुख अतिथींचे तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व महिलांचे अनोख्या पद्धतीने स्कॉलर केजी स्कूलच्या स्टाफने स्वागत केले. मंडप, रांगोळी, आकर्षक बॅनर, फुले, रंगवलेले बोर्ड याने शाळेचे प्रांगण या सोहळ्यासाठी दिमाखदार पद्धतीने सजवण्यात आले होते.

बहारदार संचलन सौ प्रमिला कदम यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या प्राचार्या सौ सुजाता फुटके यांच्या मार्गदर्शनाखाली सौ वर्षा लाड, सौ प्रमिला कदम, सौ राजश्री हलकंचे, सौ संगीता रोकडे, सौ ज्योती वळसे, सौ रुचिता वाडे, सौ अमृता मालेवार यांच्यासह सौ सुनेना गुट्टे सौ अश्विनी मुंडे, सौ वेणूताई तांदळे यांनी परिश्रम घेतले. सौ शोभा शांतलिंग फुटके यांनी परीक्षणासाठी प्रा वंदना जगतकर यांना सहकार्य केले.

## कलेमुळे समाज एकत्र येऊन राष्ट्र संघटीत होते - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

### नाशिक येथे सांस्कृतिक कला महोत्सवाचे उद्घाटन




तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | महाकवी कालिदास सभागृहात आज इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नाशिक शाखेच्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या भाषणात सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करत डॉक्टरांच्या तरूण पिढीने आणि समाजातील प्रत्येक घटकाने त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी कला ही केवळ मनोरंजनासाठी नसून ती आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. कला माणसाला मानसिक शांतता देते, आधार देते त्याच्या कल्पनाशक्तीला चालना देते आणि जीवनातील सौंदर्य जाणून घेण्याची दृष्टी देते. नृत्य, संगीत, चित्रकला, साहित्य यांसारख्या कला मानवाला स्वतःचा शोध घेण्याची संधी देतात. अशा कार्यक्रमांमुळे आपण आपल्या संस्कृतीच्या मुळांशी जोडले जातो आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा मिळते असे सांगत प्रत्येकाने आपल्या धकाधकीच्या जीवनात आपले सुप्तगून आणी कला जोपासली पाहिजे आणी त्याची साधना केली पाहिजे असे मत व्यक्त केले. डॉ.इंगोले यांनी अशा प्रकारचे कार्यक्रम यापुढेही होत राहावेत, अशा शुभेच्छा देत कला ही फक्त व्यक्तीपुरती मर्यादित नसते, तर ती समाजाला आणी राष्ट्राला एकत्र बांधण्याचे काम करते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या जीवनात कलेला स्थान दिले पाहिजे. असे मत व्यक्त केले. झालेल्या यां बहारदार कला उत्सव कार्यक्रमात विविध डॉक्टर्स कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक नृत्य, गायन, वाद्यसंगीत आणि नाट्य यांचा समावेश असलेल्या सादरीकरणांनी कार्यक्रमात रंगत आणली. विशेषतः स्थानिक डॉक्टर्सनी सादर केलेल्या नृत्य कलाकृतींनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक शाखेचे सांस्कृतिक सचिव डॉ.मिलिंद भराडिया, डॉ.आदिती वानखेडे, डॉ.परीक्षित महाजन, डॉ.पंकज चव्हाण, डॉ.अनुप भारती डॉ मंजुषा, डॉ.राजेंद्र कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरातील डॉक्टर्स कलाकारांना आपली कला सादर करण्याची उत्तम संधी मिळाली. विविध कला, संगीत, नृत्य आणि स्थानिक कला परंपरांचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम रसिकांच्या मनाचा ठाव घेणारा ठरला असे मत उपस्थित कला प्रेमीनी व्यक्त केले. कार्यक्रमाला शहरातील सर्व डॉक्टर्स, प्रतिष्टीत नागरिक,

# स्त्रियांनी आत्मसन्मान जपत कुटुंबाची काळजी घ्यावी : नगराध्यक्षा शिफा मेहरीन बिलाल चाऊस

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | स्त्रियांनी आत्मसन्मान जपत कुटुंबाची काळजी घ्यावी असे प्रतिपादन माजलगावच्या नगराध्यक्ष शिफा मेहरीन बिलाल चाऊस यांनी केले. येथील भा.शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय व महिला तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या.



अध्यक्षस्थानी सुरेंद्र रेदासणी तसेच मंचावर मुख्याधिकारी सुंदर बोंदर, अभय कोकड, एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, डॉ. प्रेमनंदा घडसिंग, डॉ.शिवशंकर मिटकरी, डॉ. ज्ञानेश्वर गवते, प्रा.अशोक होके. मीनाक्षी बामनकर उपस्थित होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, महिला व मुलींची सुरक्षितता व नागरी स्वच्छता या घटकांना मी नगराध्यक्ष म्हणून प्राधान्य देईल. त्याचबरोबर महिलांनी स्वतः शिक्षित होऊन आपल्या परिवाराच्या सर्व सदस्यांना शिक्षित करावे. मुख्याधिकारी सुंदर बोंदर म्हणाले की, महाविद्यालयाचा हा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. समाजाच्या एका दुर्लक्षित घटकाकडे आपण या माध्यमातून लक्ष केंद्रित केले व आपण सफाई कर्मचाऱ्यांचा केलेल्या सत्कार पाहून या महिलांना अजून कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. प्राचार्य मुकुंद देवर्षी म्हणाले की, महिलांच्या कर्तुत्वाचा सन्मान करणारी आपली भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आहे. अध्यक्षीय भाषणात सुरेंद्र रेदासणी म्हणाले की, महाविद्यालयाच्या अशा अभिनव उपक्रमाचे कौतुकच आहे अशा उपक्रमाच्या माध्यमातून आपण सामान्य जनतेशी जोडलेले असणे गरजेचे आहे. प्रास्ताविक प्रा. सुवर्ण पांचाळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा जाधव यांनी केले तर आभार डॉ. प्रेमनंदा घडसिंग यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ.युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार, प्रा.प्रीती कळसणे, प्रा. स्वाती साखरे, प्रा. पूजा मस्के, प्रा.पूजा सिंग, श्रीमती आशाताई कांबळे, पल्लवी आगे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद विज्ञानमध्ये विशाल परिहारचा विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विशाल परिहार याने नॅशनल एन्व्हायर्नमेंटल युथ पार्लमेंटच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले.त्याच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरावरून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली.

ही राष्ट्रीय स्पर्धा दि.१४ ते १५ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडली.देशभरातील विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता.त्यात विशाल परिहार यांनी पर्यावरण विषयक भूमिका मांडली.याचबरोबर त्याची राष्ट्रीय पर्यावरण युवा संसद नागपूरमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व आणि युवा संसद (विकासित भारत) साथीसाठी राज्यस्तरावर निवड झालेली आहे.

त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, प्रा.मेघा पंडित, डॉ.गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### क्रिएटिव्ह फाउंडेशनच्यावतीने विशाल महाराज यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन

**औसा :** क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या वतीने बुधवार दि.११ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता औसा येथील उटगे मैदानावर प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. श्री विशाल महाराज खोले यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष ड. परीक्षित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त या विशेष आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कीर्तनाच्या माध्यमातून समाजात सद्भावना, संस्कार आणि अध्यात्मिक मूल्ये रुजवण्याचा संदेश देण्याचा या कार्यक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.ह. भ. प. विशाल महाराज खोले यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वशैली आणि भावस्पर्शी कीर्तनासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कीर्तनातून अध्यात्म, समाजप्रबोधन आणि संत साहित्याचा गोड संगम अनुभवायला मिळतो.

परिसरातील नागरिक, वारकरी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच हा कार्यक्रम शांतता व शिस्तीने पार पाडण्यासाठी आयोजकांकडून आवश्यक व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### आनंदवाडी ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**शिरूर अनंतपाळ :** आनंदवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महान समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीच्या प्रगतीचा गौरव करण्यात आला. स्त्री म्हणजे वास्तव, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे पावित्र्य आणि स्त्री म्हणजे कर्तृत्व. नारीचे कर्तृत्व विशाल असून ती प्रत्येकाच्या उर्जेची मशाल आहे, अशा शब्दांत उपस्थित महिलांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे, हुंडाबंदी करणे तसेच महिला सक्षमीकरण यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच महिलांच्या सूचनांनुसार दोन दिवसांत डोळ्यांचे व सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या कार्यक्रमास उबाटा शिवसेना तालुकाध्यक्ष आणि आनंदवाडी गावचे सरपंच भागवत वंगे, उपसरपंच व्यंकट कल्ले, ग्रामविकास अधिकारी संजय रोडेवाड, रंजित मरे, सदस्य सारिका शिरूरे, बालिका कल्ले, रूक्मिणबाई वंगे, बचत गटाच्या अनुसया शिरूरे, मंडोदरी चलमले, अनुसया डोंगरे, सुवर्णा आर्धे, सुजाता दिवेकर, सुधामती दिवेकर, मिना चलमले, उर्मिला कोल्हे, अंजली सोनवणे, गयाबाई भूसागरे, कांताबाई बनसोडे आदी महिला उपस्थित होत्या.

### दयानंद कलात विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

**लातूर:** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, रोटरी क्लब व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर सोमवार दि. ०९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. तर रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी आणि दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे यांनी केले होते.

आजच्या आधुनिक युगात विद्यार्थिनींमध्ये फास्ट फूड चे सेवन मोठ्या प्रमाणात सुरू झालेले आहे त्यामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होत चाललेले आहे. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे त्यांना त्याची जाणीव निर्माण करून या शिबिरामध्ये विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते यांनी केले. या कार्यक्रमात १७७ विद्यार्थीनींची तपासणी करण्यात आली. रो.जकी खान कायमखनी अध्यक्ष रोटरी क्लब लातूर च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिन वृध्दीसाठी राजगिरा लाडू वितरित करण्यात आले.

# निकोप स्पर्धेच्या माध्यमातूनच विश्वशांती

## विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांचे विचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० मार्च :** जगामध्ये संपूर्ण जीव सृष्टीला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवेल अशी भयंकर युद्ध स्थिती निर्माण झाली आहे. आज गरज आहे ती परस्परांबद्दल जिव्हाळा, आत्मियता, प्रेम, संघ भावनेची आणि हे केवळ खेळाच्या भावनेतूच शक्य होऊ शकते. युद्धाच्या जागी खेळ आणि विनाशाच्या जागी विकास हा संदेशच कुस्तीच्या माध्यामातून दिला जाईल. हे मैदान जागतिक शांततेचा एक आखाडा आहे. येथे स्वराज्य आणि स्वराष्ट्राच्या मातीतील कुस्तीचा विजयी नाद घुमणार आहे. असे विचार विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) च्या पवित्र यज्ञ भूमीवर विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात अभूतपूर्व राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलते होते.

### राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा- २०२६चे उद्घाटन

यावेळी हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, आपसाहेब कदम, बंडातात्या पाटिल, बापूसाहेब मोरे, विष्णू जोशीलकर, रामेश्वर (रुई)चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, काशीराम दा. कराड, आमदार रमेशअप्पा कराड, डॉ. हनुमंत कराड, श्री. राजेश कराड, श्री. ऋषिकेश कराड, प्रा.तेजस कराड, श्री. बाळासाहेब बडवे, श्री. सरकार निंबाळकर, डॉ. एस.एन. पठाण, डॉ. रत्नदीप जोशी, डॉ. महेश थोरवे व प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मऊ मेणाहूनि आम्ही विष्णूदास कठीण वज्रास भेदू ऐसे अशी परंपरा असलेल्या या गावात जागतिक स्तरावरील पैलवान येत आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. खेळ परंपरेचा असून लोकांना जोडणारा असून भावी जीवनाला दिशा देणारा आहे. ही स्पर्धा १९ वर्षापासून सुरू आहे.



दिनानाथ सिंग म्हणाले, आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड हे खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. डॉ. कराड हे पुनम का चाँद आहे. त्यांनी पैलवानांना जो आधार दिला त्यातून त्यांचे खेळाप्रती प्रेम दिसून येते. ही स्पर्धा सतत अशीच चालत राहावी यासाठी पुढची पिढी तयार आहे.

हभप बापूसाहेब मोरे म्हणाले, जीवनातील प्रत्येक गोष्टीतून आनंद घ्यावा हे डॉ. कराड यांच्याकडून शिकले पाहिजे. प्रत्येकाच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हे व्यासपीठ उभे केले आहे.

बाळासाहेब बडवे म्हणाले, महाराष्ट्राच्या कुस्तीचे हे वैभव अजरामर रहाण्यासाठी डॉ. विश्वनाथ कराड यांनी अद्वितीय कार्य केले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले २५० पैलवान लाल मातीत उतरणार आहेत. उद्घाटनाची कुस्ती रामेश्वर येथील प्रसाद शिंदे व कोल्हापूर येथील प्रणव राख यांच्यात झाली. कुस्ती स्पर्धेचे धावते वर्णन समालोचन बाबा निम्हण यांनी केले. प्रा. विलास कथुरे यांनी प्रास्ताविकेत कुस्ती संदर्भातील माहिती दिली व आभार मानले.

### महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा येथे 'फार्मा अन्वेषण २०२६' अंतर्गत दोन उद्योग संस्थांसोबत सामंजस्य करार



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १० मार्च :** महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा येथे राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिनानिमित्त 'फार्मा अन्वेषण २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास व उद्योग क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने दिनांक ६ मार्च २०२६ रोजी मॅट्रिक्स कोडिंग सोल्युशन तसेच इंस्टा व्हिजन लॅबोरेटरी, सातारा यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला.महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री.विजय पाटील निलंगेकर साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, व नॅक कॉर्डिनेटर डॉ. चंद्रावधन पांचाळ, आय. क्यू. ए.सी. कॉर्डिनेटर डॉ. शरद उसनाळे तसेच ट्रैनिंग व प्लेसमेंट ऑफिसर डॉ. सुनील गरड यांची प्रमुख उपस्तीथी होती.

या कराराअंतर्गत विद्यार्थ्यांना वैद्यकीय कोडिंग व आरोग्य सेवा उद्योग संदर्भात प्रशिक्षण, करिअर मार्गदर्शन व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सेमिनारमध्ये वैद्यकीय कोडिंगचे महत्त्व, आरोग्य क्षेत्रातील विविध करिअर संधी तसेच या क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच या सहकार्याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी करिअर जनजागृती सेमिनार, वैद्यकीय कोडिंग कार्यशाळा, कौशल्य विकास कार्यक्रम, इंटर्नशिप मार्गदर्शन व नोकरीसाठी सहाय्य यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. सुनील गरड यांनी केले व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रागीताने प्रा. सानुली पौळकर यांनी केली.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी विदयार्थीनी उपस्थित होते.

# अहमदपूर पंचायत समिती बिनविरोध

## - सभापतीपदी सूरज पाटील तर उपसभापतीपदी अयोध्या केंद्रे
## - पं.स. वर भाजप-राष्ट्रवादी युतीचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १० मार्च :** नुकतीच अहमदपूर पंचायत समितीच्या १२ गणांसाठी निवडणुक झाली. या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांनी महायुती केली होती. लागलेल्या निकालात राष्ट्रवादी (अजित पवार) पाच व भाजपचे ४ उमेदवार विजयी झाले तर राष्ट्रवादी (शरद पवार) चे उमेदवार दोन जागांवर आणि एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला.अपक्ष उमेदवार सुलोचना कासले यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) मध्ये प्रवेश केल्याने राष्ट्रवादीचे सदस्य संख्या ६झाली.पंचायत समितीचे सभापतीपद हे खुल्या प्रवर्गासाठी असल्याने सभापती पदाची माळ.सुरज बाबासाहेब पाटील यांच्या गळ्यात पडली. सभापती व उपसभापती निवड प्रक्रियेत राष्ट्रवादी व भाजप महायुती चे १० सदस्य उपस्थित होते.

अहमदपूर पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवड सोमवारी (दि. ९ मार्च) झालेल्या विशेष बैठकीत करण्यात आली.

सभापती पदी सूरज बाबासाहेब पाटील तर उपसभापती पदी अयोध्या अशोक केंद्रे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.



लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात ही निवड प्रक्रिया पार पडली.

या विशेष सभेसाठी पंचायत समितीच्या एकूण १२ सदस्यांपैकी १० निर्वाचित सदस्य उपस्थित होते. निवडीच्या प्रक्रियेत सभापती पदासाठी सूरज पाटील आणि उपसभापती पदासाठी अयोध्या केंद्रे यांचा प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. निर्धारित वेळेत अन्य कोणाचेही अर्ज न आल्यामुळे पीठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी या दोन्ही निवडी बिनविरोध झाल्याचे अधिकृतपणे घोषित केले.

या महत्त्वपूर्ण सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांनी जबाबदारी सांभाळली, तर सचिव म्हणून गटविकास अधिकारी पंकज शेळके यांनी कामकाज पाहिले. ही निवड प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सहायक प्रशासन अधिकारी शैलेश जोशी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी राजेश सोनकांबळे, विस्तार अधिकारी रमाकांत पट्टेवाड, धनाजी सुळे, राजू तीर्थकर, आनंद पपशेटवार आणि प्रकाश कांबळे यांच्यासह पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. नूतन सभापती व उपसभापतींच्या निवडीनंतर समर्थकांनी पंचायत समिती परिसरात गुलालाची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला.

# रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण हित लक्षात घेऊन भाजपा-मनसेची युती

## रेणापूरचे नूतन सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर यांचे आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. १० मार्च :** रेणापूर तालुक्याचे सर्वांगीण विकासाचे हित लक्षात घेऊन पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती निवडीच्या अनुषंगाने भाजपा आणि मनसेची युती करण्यात आली असून नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत रेणापूर पंचायत समितीच्या एकूण आठ जागेपैकी भाजपाला तीन, मनसे दोन आणि काँग्रेसला तीन याप्रमाणे विजय प्राप्त झाला आहे. पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि मनसेचे नेते संतोष नागरगोजे यांच्यात चर्चा होवून रेणापूर तालुक्याच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून सर्वांगीण हित लक्षात घेऊन युती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.



भाजपा मनसेच्या युतीनुसार रेणापूर पंचायत समितीच्या सभापती पदाकरिता मनसेच्या सौ मोनिका रवींद्र सूर्यवंशी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली तर उपसभापती पदाकरिता भाजपाचे शरद दरेकर यांना पाच मते आणि काँग्रेसचे बालाजी घोडके यांना तीन मते मिळाल्याने भाजपाचे शरद दरेकर उपसभापती पदासाठी विजयी घोषित करण्यात आले.

सदरील निवड जाहीर होताच आ. कराड यांच्या भाजपा संवाद कार्यालयात नवनिर्वाचित रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ मोनिका रवींद्र सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांचा भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मनसेचे नेते संतोष नागरगोजे, डॉ नरसिंह भिकाने, शिवकुमार नागराळे, भागवत शिंदे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

शासनाच्या विविध योजना निश्रि्चतपणे खेचून आणू मात्र कोणाचीही आडवणूक होणार नाही याची काळजी घेऊन नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की,लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे वैभव जपण्याचे काम पंचायत समितीच्या माध्यमातून व्हावे आपल्या कामाचा विभागातच नव्हे तर राज्यात वेगळा ठसा निर्माण करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. भ्रष्टाचार मुक्त आणि स्वच्छ प्रशासन देऊन लोकांच्या अडीअडचणी निश्रि्चतपणे सोडवणूक करून रेणापूरची पंचायत समिती आदर्श निर्माण करू अशी ग्वाही मनसेचे संतोष नागरगोजे यांनी दिली. नेत्यांच्या विश्र्वासाला पात्र राहून काम करू कुठेही तडा जाणार नाही असे नवनिर्वाचित सभापती सौ मोनिका सूर्यवंशी आणि उपसभापती शरद दरेकर यांनी बोलून दाखविले. प्रारंभी आ. कराड आणि नागरगोजे यांचे नूतन पदाधिकाऱ्यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी दशरथ सरवदे यांनी आभार मानले.

यावेळी मनोज कराड, सुकेश, विजय गंभीरे, बाळासाहेब मुंडे, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, वाहेद शेख, श्रीपाद बस्तापुरे, संतोष चव्हाण, राज जाधव, निवृत्ती लहाने, ओम चव्हाण, गोपाळ पडिले, धनंजय पवार, नवनाथ माने, महेश गाडे, लक्ष्मण खलंग्रे, अच्युत कातळे, लक्ष्मण यादव, विजय चव्हाण, साजिद पटेल, उत्तम चव्हाण, सुरेश बुड्डे, नंदकुमार वल्लमपल्ले, श्रीमंत नागरगोजे, अजित पाटील, जयप्रकाश जटाळ, प्रमोद आंबेकर, रवी सूर्यवंशी, माणिक शिरसाट, प्रकाश गालफाडे, नरसिंग भताने शिवराज शिरसाट, बलभीम जाधव, भैय्या गाडे, प्रकाश जाधव यांच्यासह दोन्ही पक्षाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा :जिल्हाधिकारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मार्च-**

जिल्ह्यात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा २००३ (पीसीपीएनडीटी) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करत बेकायदेशीर गर्भलिंग निदान व स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कडक कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा २००३ (पीसीपीएनडीटी) ची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावर स्थापन दक्षता पथकाची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात ९ मार्च रोजी पार पडली.

या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके, मनपा नांदेडचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी, अन्न व औषधी



प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त, जिल्हा रुग्णालय नांदेडचे निवासी वैद्यकीय अधिकारी, पीसीपीएनडीटी विधी समुपदेशक तसेच समितीचे अशासकीय सदस्य डॉ. किशोर अतनूरकर व डॉ. शोभा वाघमारे उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील विविध समुचित प्राधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेऊन पीसीपीएनडीटी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, संबंधित विभागांमध्ये समन्वय राखणे, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी जनजागृती करणे तसेच प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक तथा सदस्य सचिव डॉ. संजय पेरके यांनी जिल्ह्यातील व तालुक्यातील सोनोग्राफी केंद्रे तसेच एमटीपी केंद्रांच्या नोंदणी व नूतनीकरणाचा आढावा सादर केला. तसेच जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती व समुचित प्राधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा मांडला. स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सामाजिक संस्थांच्या सहभागातून प्रबोधनात्मक जनजागृती होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अवैधरित्या होणाऱ्या गर्भपातास आळा घालण्यासाठी अन्न व औषधी प्रशासन विभागामार्फत ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले. तसेच शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या खबरी योजनेअंतर्गत गर्भलिंग निदानाबाबत माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

**खबरी योजना**

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी, गर्भलिंग निदान प्रतिबंध आणि स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी गर्भधारणा व प्रसवपूर्व निदानयंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित कायदा २००३ पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे.

गर्भलिंग निदान प्रतिबंध, लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविणे आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कायद्याअंतर्गत तक्रार नोंदविण्यासाठी महाराष्ट्र राज्य पीसीपीएनडीटी टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५ तसेच १०४ उपलब्ध आहेत. तसेच http://amchimulgimaha.in या संकेतस्थळावरही तक्रार नोंदविता येते. तक्रारदाराची माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते.

तक्रारीच्या आधारे कारवाई होऊन गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात येणार असून अशा प्रकारे स्त्री भ्रूणहत्या रोखण्यात यश आल्यास तक्रारदारास शासनामार्फत खबरी योजनेअंतर्गत १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

# नगर परिषदेच्या गाळ्यातील 'पोटभाडेकरूंचा' बाजार उठणार !

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १० मार्च-**

नगर परिषदेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळ्यांचा वापर नियम धाब्यावर बसवून केला जात असल्याच्या तक्रारी होत असुन अनेक मूळ भाडेधारकांनी नगर परिषदेकडून कवडीमोल दरात भाड्याने घेतलेले गाळे अव्वाच्या सव्वा किमतीत 'पोटभाडेकरूंना' दिले आहेत.



या अनधिकृत व्यवहारांमुळे नगर परिषदेचा महसूल बुडत असल्याने सर्वच गाळ्यांचे सर्वेक्षण करून अनधिकृत वापरावर कठोर निर्बंध घालणार असल्याचे बांधकाम सभापती राम नेमानीवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

नगर परिषदेकडून शहरातील सुशिक्षित बेरोजगारांना आणि छोट्या व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी अल्प दरात गाळे उपलब्ध करून देण्यात येतात.मात्र, अनेक 'बड्या' भाडेधारकांनी हे गाळे स्वतः न चालवता दुसऱ्यांना पोटभाड्याने दिले आहेत.नगर परिषदेच्या करारात पोटभाडेकरू ठेवण्यास सक्त मनाई असताना नगर परिषदेच्या सर्वच व्यापारी संकुलातील

मूळमालकानी मागील कित्येक वर्षांपासुन भाडे कराराच्या अटी व शर्तींना धाब्यावर बसवून पोटभाडेकरूं ठेवले आहेत. या पोटभाडेकरू कडून गाळ्याचा गैरवापर होत आहे. काही महाभागानी या शासकीय मालमत्तेत अवैध व्यवसाय सुरु केले असुन मटका जुगार लॉटरी देशी दारू यासह परवाना नसलेले व्यवसाय राजरोसपणे सुरू आहेत.तर काही महाभागानी या गाड्यांची परस्पर लाखो रुपयात विक्री केल्याचे समजते.यासंदर्भात जागृत नागरिकाकडून सातत्याने तक्रारी केल्या जात असतानाही नगरपालिका प्रशासनाकडून त्याची दखल घेतली जात नव्हती अनेक गाळ्यांचा वापर ज्या कारणासाठी घेतला होता, त्याऐवजी दुसऱ्याच कामासाठी केला जात असुन बांधकाम सभापती राम नेम्मानीवार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत ॲक्शन प्लॅन तयार केला आहे.लवकरच अशा गाळ्यांचे सर्वेक्षण करून

प्रत्यक्ष जागेवर तपासणी केली जाणार असुन गाळ्यात बसलेली व्यक्ती मूळभाडेधारक आहे की पोटभाडेकरू, याची पडताळणी करण्यात येईल. तसेच अटीं- शर्तीचा भंग करणाऱ्या भाडेधारकांना तात्काळ नोटिसा पाठवल्या जातील आणि नियमांचे उल्लंघन सिद्ध झाल्यास संबंधित मूळ मालकाचे वाटप रद्द करून गाळा पुन्हा नगर परिषदेच्या ताब्यात घेण्याची कारवाई केली जाईल.नगर परिषदेच्या मालमत्तेचा गैरवापर खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट करत नियमांचे उल्लंघन करून पोटभाडेकरू ठेवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत राम नेम्मानीवार यांनी दिले आहेत. नगराध्यक्ष सौ.सुजाता विनोद एंड्रलवार यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या चोखंदळ आणि पारदर्शक कारभाराला आमचे प्राधान्य राहणार आहे.याचाच एक भाग म्हणून आम्ही 'गाळे अपडेटिंग' करण्याचे काम हाती घेणार आहोत असेही त्यांनी स्पष्ट केले.

किनवट शहरातील बाजारपेठवृद्धीच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून जे अनेक वर्षापासून 'गुंतवणूक' म्हणून गाळ्याचा अनधिकृत वापर करत आहेत अशांचे आता धाबे दणाणले आहेत..



# जागतिक महिला दिनानिमित्त न.पा महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा साडी-चोळी भेट

**लोहा** -जागतिक महिला दिनानिमित्त लोहा नगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत शहरातील माता-भगिनींनी पुढाकार घेत रस्त्यावर उतरून स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सामूहिक सहभाग किती आवश्यक आहे, याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या स्वच्छता अभियानासाठी लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी पुढाकार घेतला. यावेळी उपनगराध्यक्ष करीम शेख, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक केशवराव मुकदम, हरिभाऊ चव्हाण, केतन खिल्लारे, राजेश बोडके, तुकाराम दाढेल, सदानंद तेलंग, मारुती जंगले, पंकज परिहार, अविनाश पवार, गणेश बगाडे, नारायण येलरवाड , माजी नगरसेविका शोभाताई बगडे, मराठा सेवा संघाच्या तालुका अध्यक्षा वर्षाताई जामगे, डॉ. सविताताई घंटे, सविताताई सातेगावे, प्रकल्प अधिकारी मंजुषा जाधव, स्वच्छता निरीक्षक लता ढवळे, डोंगरे ताई, प्रा. डॉ. डी. एम. पवार, व्यापारी तुकाराम कोटलवार, विजय कोटलवार, प्रा. संजय मक्तेदार, गंगाधर मामा महाबळे यांच्यासह नागरिकानी सहभाग नोंदवला जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख यांच्या हस्ते महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला.

# माहूर शहर पोलीस ठाण्यातील रिक्त पदे तातडीने भरावी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १० मार्च-**

माहूर सारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे व प्रतिनियुक्त्यांमुळे गर्दीचे व्यवस्थापन कोलमडणे,गुन्हेगारीत वाढ होणे आणि सुरक्षेच्या गंभीर समस्या निर्माण होऊन पोलीस कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढून तपासातील गुणवत्ता व भाविकांच्या सुरक्षिततेवर परिणाम होऊन आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे कठीण जात असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने शहर पोलीस ठाण्यातील रिक्त पदे तातडीने भरावीत तसेच इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द करून त्यांना मूळ नियुक्तीच्या ठिकाणी म्हणजेच माहूर

### नगराध्यक्ष दोसानी यांची पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांना निवेदनाद्वारे मागणी!

शहर पोलीस ठाण्यात रुजू करण्यात यावे, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी यांनी दि.१० मार्च रोजी माहूर भेटीत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांना निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

माहूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे दररोज तसेच सण-उत्सव, यात्रा व उर्स काळात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. राज्यासह देशातील अनेक मान्यवर तसेच व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी व्यक्तींचेही येथे आगमन होत असते.

माहूर पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून शहर वगळता दुर्गम डोंगराळ गावांचा समावेश या हद्दीत आहे. सध्या पोलीस ठाण्यात अनेक पदे रिक्त असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखताना पोलीस प्रशासनावर अतिरिक्त ताण येत आहे.याशिवाय माहूर पोलीस ठाण्यातील काही कर्मचारी सध्या इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असल्यामुळे मनुष्यबळाची कमतरता अधिकच जाणवत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक तसेच भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही बाब गंभीर ठरत असल्याचेही निवेदनातून सांगण्यात आले आहे.

# भोकर न.प.कडून मालमत्ताकर वसूली मोहीम

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १० मार्च-**

मालमत्ता धारकांकडील असलेली थकीत मालमत्ताकर व पाणीपट्टी कर वसूलीसाठी नगरपरिषदेने वसूली मोहिम राबविण्यात आली. शहरातील मालमत्ता धारकांकडील थकीत मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी कर अनेक दिवसापासून थकीत असल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत दिनांक ०९ मार्च रोजी मुख्याधिकारी ऋषभ पवार यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत



घेऊन शहरातील मालमत्ताकर व पाणीपट्टी कर वसुली मोहीम सुरू करण्यात आली असून भोकर शहरातील सर्व मालमत्ता धारक आपल्याकडे असलेली थकबाकी तात्काळ कार्यालयात येऊन भरण्यात यावी अन्यथा नळजोडणी बंद करण्यात येईल व रीतसर कारवाई करण्यात येईल मुख्याधिकारी ऋषभ पवार यांनी शहरातील नागरिकांना आवाहन केले की भोकर शहरातील थकबाकीदारांकडे थकीत असलेली रक्कम भरून पावती घ्यावी व नगरपालिकेला सहकार्य करण्यात यावे असे आवाहन नगरपालिकेच्या वतीने करण्यात आले.

# कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १० मार्च-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील कर्तृत्ववान व कष्टाळू महिलांचा रविवार दि.८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिना'चे औचित्य साधत त्यांच्या घरी जाऊन पुष्पगुच्छ व छोटीशी भेट देऊन त्यांचा यथोचित मान्यवरांकडून सन्मान करण्यात आला. यावेळी प्रेमलाबाई इरवंत टेंकाळे (हलबुर्गे),सरुबाई गंगाधर भुरे आणि शमीमबी अलीम शेख यांच्या कष्टमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाला यावेळी कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले.

यावेळी अभिजीत महाजन, सौ.हेमलता देमेवार,सौ. नयना जोशी, ऊर्जा महाजन, शंकरराव मालीपाटील, राजेश लुटे गुरूजी,तरूण भारत पत्रकार जाफर आदमपूरकर, राम हलबुर्गे,राजेश मुंडकर व गणेश पाटील (लिंबुरे) यांची उपस्थिती होती.

# ग्रामविकास अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मार्च-**


कंधार तालुक्यातील उस्माननगर येथील ग्रामविकास अधिकाऱ्यांनी विविध योजनेत भ्रष्टाचार केला असून, या भ्रष्टाचाराची चौकशी करुन ग्रामविकास अधिकाऱ्यास निलंबित करावे, अशी मागणी बालाजी इसादकर यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

कंधार तालुक्यातील उस्माननगर येथे ग्रामविकास अधिकारी डी.ए.शिंदे या मागील सात वर्षापासून कार्यरत आहेत. शासनाकडून येणाऱ्या कोट्यावधीची निधीची कामे त्यांचे पती गुत्तेदारांच्या मार्फत करत आहेत. दि.१९ एप्रिल २०२२ रोजी याठिकाणी जी.डी. टोकले यांची बदली झाली होती, परंतु त्यांना चार्ज देण्यात आला नाही. तर दि.२४ एप्रिल २०२४ रोजी डी.व्ही.चोंडे यांचीही बदली याठिकाणी झाली होती, परंतु त्यांना पदभार देण्यात आला नाही. ग्रामविकास अधिकारी व त्यांचे पती मिळून शासनाच्या निधीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करत असून, या भ्रष्टाचाराच्या पैश्यातून त्यांनी अमाप संपत्ती गोळा केली असून, या सर्व प्रकाराची चौकशी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बालाजी इसादकर यांनी निवेदनाव्दारे दिला आहे. निवेदनावर माणिक पाटील, संजय वारकड, गंगाधर भिसे, अशोक काळम, दत्ता घोरबांड आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ईस्लापूर पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १० मार्च-**

पोलीस उपमहानिरीक्षक परिक्षेत्र नांदेड शहाजी उमाप 'यांनी आज ईस्लापूर पोलीस स्टेशन येथे वार्षिक तपासणी केली. यावेळी गावकरी, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच पत्रकारांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



या तपासणीवेळी अप्पर पोलीस अधीक्षक भोकर अर्चनाताई पाटील 'तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष व स्थानिक नागरिकांनी विविध समस्या मांडल्या. या समस्यांचे निराकरण लवकरच करण्यात येईल, असे आश्वासन उमाप यांनी दिले.

यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस पाटील व होमगार्ड जवानांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच सहस्त्रकुंड येथील मच्छीमार (भोई) यांनी नदीपात्रात अडकलेल्या सात जणांना सुरक्षितपणे वाचवल्याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

दरम्यान, ईस्लापूर पोलीस स्टेशन अंतर्गत कर्मचारी संख्या कमी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच ज्या ठिकाणी पोलीस पाटील पदे रिक्त आहेत, ती लवकरात लवकर भरावीत, अशी मागणीही नागरिकांनी केली

# विद्यार्थ्यांना संस्कृती, संस्कार आणि नैतिकतेचे शिक्षण द्यावे : रुचिरा बेटकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मार्च-**

आई नंतर विद्यार्थी घडवण्यासाठी आई इतकीच माया लावणाऱ्या शिक्षकांनी विद्यार्थी घडवत असताना संस्कार, संस्कृती आणि नैतिकतेचे शिक्षण देणे अपेक्षित आहे. तरच उद्याचा समृद्ध समाज आणि समृद्ध राष्ट्र निर्माण होईल असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवयित्री रुचिरा बेटकर यांनी व्यक्त केले.

सहयोग एज्युकेशनल कॅम्पसच्या डीएड आणि बीएड विद्यार्थ्यांचे सरस्वती निकेतन हायस्कूल नाईक नगर येथे अंतरपाठ सुरू आहेत. महिला दिनाचे औचित्य साधत भावी अध्यापकांशी संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी सरस्वती निकेतन हायस्कूलच्या सहशिक्षिका एच के डोंगरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून कवयित्री रुचिरा बेटकर यांच्यासह प्रा. आम्रपाली भद्रे , प्रा. एम पी झुंजार, प्रा. व्ही. एस. मठपती आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापिका ऋतुजा जाधव हिने केले तर प्रास्ताविक साक्षी वाठोरे यांनी



केले.

यावेळी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधताना कवयित्री रुचिका बेटकर म्हणाल्या की, विद्यार्थ्यांची मानसिकता जाणून घेऊन त्यांना शिकवणे आवश्यक आहे . भावनिक ,सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास होण्यासाठी शिक्षकांनी परिश्रम घेणे आवश्यक आहे . प्रत्येक शिक्षक हा अद्यावत असणे आवश्यक आहे. वर्तमान परिस्थिती समजून घेत असतानाच भविष्याचा वेध घेऊन अत्याधुनिक पद्धतीने ज्ञानदान करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आई, वडील आणि शिक्षकांचे ऋण फेडण्यासाठी उच्चशिक्षित होऊन स्वतः मोठे होऊन , इतरांना आधाराची सावली देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगत रुचिरा बेटकर यांनी बिघडत चाललेली नैतिकता नीतिमत्ता याबद्दलही प्रखर मत व्यक्त केले . प्रत्येक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी आपल्या कुटुंबाची सांस्कृतिक परंपरा टिकून ठेवण्यासाठी वाडवडिलांनी ठरवून दिलेल्या सामाजिक नियमांचे पालन करावेत. समाजाला घातक ठरते असे कोणतेही कृती विद्यार्थ्यांनी करू नयेत. खास करून मुलींनी आपली, आपल्या कुटुंबाची पत आणि प्रतिष्ठा खराब होणार नाही याची जाणीव ठेवून सामाजिक जीवनात वर्तन करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# बनावट नोटबंदीसाठी ठोस कार्यवाही व्हावी : खा. डॉ. अजित गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मार्च-**

देशातील चलनी नोटांच्या वापरात बनावटी नोटांचा शिरकाव झाल्याने सर्वच घटकाची मोठ्याप्रमाणात लुबाडणूक आणि फसवणूक होत आहे.त्यामुळे बनावटी नोटा चलनात येऊच नयेत आणि सामान्यांची फसवणूक होऊ नये यासाठी केंद्र सरकारने ठोस कार्यवाही करावी अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी राज्यसभेत केली आहे.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी देशात वाढत चाललेल्या बनावट भारतीय नोटांच्या गंभीर प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले.२० रुपयांपासून ते ५०० रुपयांपर्यंत बनावट नोटांचा वाढता वापर चिंताजनक



असल्याचे त्यांनी नमूद करत या संदर्भात ठोस व प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली. राज्यसभेत बोलताना डॉ. गोपछडे म्हणाले की, बनावट नोटांचा प्रश्न आता केवळ मोठ्या शहरांपुरता मर्यादित राहिलेला नाही; तर लहान शहरे, तालुके, गावे आणि स्थानिक बाजारपेठांपर्यंतही तो पसरत आहे. यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक फटका बसत आहे. विशेषतः गरीब, शेतकरी, मजूर, लहान दुकानदार आणि मध्यमवर्गीय नागरिकांवर याचा अधिक परिणाम होत असून हे घटक आजही नगदी व्यवहारांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. डॉ. गोपछडे यांनी पुढे नमूद केले की, काळानुसार बनावट नोटा तयार करणाऱ्यांची कार्यपद्धती बदलली आहे. आता मोठ्या प्रमाणावर नव्हे, तर लहान-लहान संख्येत बनावट नोटा बाजारात सोडल्या जात आहेत, ज्यामुळे सामान्य लोकांना त्या ओळखणे अधिक कठीण होत आहे. बनावट चलनाच्या समस्येवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी डॉ. गोपछडे यांनी सदनात 'सप्त-शक्ती' धोरणाचा प्रस्तावही मांडला. यामध्ये बनावट नोटांची माहिती देणाऱ्या प्रामाणिक नागरिकांचे संरक्षण व नुकसानभरपाई, बँकांमध्ये सुलभ तक्रार नोंदणी व्यवस्था, बनावट नोटांच्या तपासासाठी केंद्रीय यंत्रणेची स्थापना, ठइख, छ्ख आणि एऊ यांची संयुक्त स्थायी टास्क फोर्स, दर ८ ते १० वर्षांनी नोटांमधील सुरक्षा वैशिष्ट्यांमध्ये बदल, या गुन्ह्यासाठी कठोर शिक्षा तसेच सीमावर्ती भागात आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आधारित देखरेख यांचा समावेश आहे.

ते पुढे म्हणाले की, बनावट चलनाचा प्रसार हा केवळ आर्थिक गुन्हा नसून राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय आहे. त्यामुळे याविरोधात समन्वित आणि कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे असेही त्यांनी नमूद केले.


## मुदखेड नगरपरिषद मुदखेड
### ता. मुदखेड जि. नांदेड
### ई-निविदा सूचना सन २०२५-२६ (दुसरी वेळ)

मुदखेड नगरपरिषद मुदखेड जि. नांदेड यांचेकडून मुदखेड नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांची संख्या मर्यादित ठेवणे, रेबीज निर्मुलन करणे, मनुष्य कुत्रा संघर्ष टाळणे ई. बाबींच्या अनुषंगाने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करून संख्या नियंत्रित करणे. या कामा संबधी ई-निविदा दि. १०/०३/२०२६ ते दि.१९/०३/२०२६ पर्यंत मागविण् येत आहे. सदरील कामासंबधीचा सविस् तर तपशील यात https:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद मुदखेड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विद्यार्थ्यांनी यश गाठण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत– समीर यंबल

## शांताबाई दराडे विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतीदिन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

जीवनामध्ये यश गाठण्यासाठी विद्यार्थ्यांनी ध्येयाकडे सातत्यपूर्ण वाटचाल केली पाहीजे. जिद्द, मेहनत आणि चिकाटी या गुणांमुळे निश्चितपणे ध्येय साधता येते असे मत माजी विद्यार्थी तथा भारत बिजली लिमीटेडचे जनरल मॅनेजर समीर यंबल यांनी व्यक्त केले.

शहरातील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात दि १० मार्च रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे तर प्रमुख वक्ते म्हणून भारत बिजली लिमीटेडचे जनरल मॅनेजर तथा माजी विद्यार्थी समीर श्रीअंश यंबल यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, अंकुश शिंदे, पर्यवेक्षक भारत शिंदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलतांना माजी विद्यार्थी तथा भारत बिजली लिमीटेडचे जनरल मॅनेजर समीर यंबल यांनी सांगितले की, जीवनात चढउतार येत असतात. अपयशाने खचून न जाता अपयशातून यश कसे साध्य करता येईल याचा विद्यार्थ्यांनी नेहमीच विचार केला पाहीजे. यश मिळवण्यासाठी सातत्य असणे गरजेचे आहे. ध्येय निश्चित करून त्याच्याकडे वाटचाल करतांना मेहनत, चिकाटी आणि जिद्द आपल्या अंगी असली पाहीजे. केवळ मेडीकल आणि इंजिनीअरींगच्या मागे न लागता विद्यार्थ्यांसाठी आता अनेक वाटा आहेत. सध्या डिजीटल युग असल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत. सध्याच्या परिस्थितीला अनुकुल असे अनेक अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कौशल्यानुसार त्या क्षेत्रात वाटचाल केली पाहीजे.

समीर यंबल यांनी त्यांच्या शालेय जीवनातील आठवणींना यावेळी उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डॉ अंभोरे यांनी समीर यंबल सारखे अनेक विद्यार्थी या शाळेतून घडले असून अशा यशस्वी विद्यार्थ्यांचा आपण आदर्श डोळ्यांसमोर ठेवला पाहीजे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संजय कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पहिल्याच दिवशी आपले सरकार सेवा केंद्राच्या निवडीवर आक्षेप

## मुळ गावकऱ्यांना डावलल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

जिल्ह्यात नव्याने स्थापन केल्या जाणाऱ्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी प्राथमिक निवड यादीत गा–वातील मुळ रहीवाशी नसलेल्याची निवड झाल्याने दि १० मार्च मंगळवारी जिल्हा प्रशासानाकडे दुपारपर्यंत ५० पेक्षा अधिक गावकऱ्यांनी तक्रार दाखल केल्याने आता ही प्रक्रियाच वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हिंगोली जिल्ह्यासाठी ४३० आपले सरकार सेवा केंद्रासाठी दि २२ डिसेंबर २०२५ रोजी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार या केंद्रांसाठी जिल्ह्यातून तब्बल ३ हजार अर्ज जिल्हा प्रशासानाकडे प्राप्त झाले होते. त्यानंतर झालेल्या छाननीमध्ये १८६१ जण मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात दि ३ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत मुलाखती घेण्यात आल्या. त्यानंतर दि ९ मार्च सोमवारी प्राथमिकदृष्टया निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. मात्र जिल्ह्यातील पाचही तालुक्यातून प्रसिध्द झालेल्या यादीमध्ये आपले सरकार सेवा केंद्रासाठी निवड झालेल्या उमेदवारांची नावे पाहून त्या गा–वातील मुळे रहीवाशी असलेल्या उमेदवारांवर डोळे पांढरे करण्याची वेळ आली. गावातील मुळ रहीव–ाशी नसलेल्या उमेदवारांची त्या गावासाठी निवड झाल्याने इच्छुक उमेवारांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. काही ठिकाणी उमेदवारांना शैक्षणिक कागदपत्रांच्या मुळ प्रत, डिग्रीच्या मुळ प्रत याशिवाय रहीवाशी प्रमाणपत्र मागविण्यात आले. तर काही जणांनी चक्क भाडे करारनामा सादर करून आपण त्या गावात किरायाने राहत असल्याचे दाखवले आहे.

या प्रकारानंतर आता उमेदवारांनी तक्रारी करण्यात सुरूवात केली असून मंगळवारी दि १० मार्चला दुपारपर्यंत ५० पेक्षा जास्त तक्रारी आल्या आहेत. या प्रकारामुळे ही प्रक्रिया वादात सापडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

मुलाखतीत तात्पुरत्या स्वरूपात निवड झालेल्या उम–ेदवारांनी त्यांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दि. १२ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी ११ वाजता तालुकानिहाय आयोजित केला आहे. औंढा नागनाथ तालुक्यासाठी दि. १२ मार्च २०२६, वसमत तालुका दि. १३ मार्च २०२६, हिंगोली (शहरी व ग्रामीण) तालुका दि. १६ मार्च २०२६, सेनगाव तालुका दि. १७ मार्च २०२६ आणि कळमनुरी तालुक्यातील मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी दि. १८ मार्च २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या कागदपत्र पडताळणीसाठी संबंधित उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालय, हिंग–ोली येथे वरील नमूद दिनांकास सकाळी ११ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची मुखेड सूतगिरणीला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**



हिंगोली विधानसभा मतदारसंघात उद्योगनिर्मितीच्या दृष्टीने पुढाकार घेत आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मधुकरराव घाटे सहकारी सूतगिरणी, मुखेड येथे भेट देऊन सूतगिरणीच्या कार्यपद्धतीचा तांत्रिकदृष्ट्या सखोल अभ्यास केला.

हिंगोली जिल्ह्यात बेरोजगारांना हाताला काम मिळावे तसेच जिल्ह्याचा उद्योग निर्मितीमध्ये सहभाग असावा यासाठी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मुखेड येथील सूतगिरणीला भेट दिली. यावेळी त्यांनी सूत निर्मिती प्रक्रिया, यंत्रसामग्री, उत्प–ादन क्षमता तसेच व्यवस्थापन पद्धतीची बारकाईने माहिती घेतली. हिंगोली मतदारसंघातही अशा प्रकारचा उद्योग उभारून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सूतगिरणीसारखे उद्योग महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी त्यांच्या समवेत माजी सभापती उत्तमराव जगताप, नगरसेवक कैलास शहाणे आदी उपस्थित होते. त्यांनीही सूतगिरणीच्या विविध विभागांची पाहणी करून व्यवस्थापनाकडून माहिती घेतली.



**हिंगोली– सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे बाजारात गरीबांचे फ्रिज म्हणून आ–ेळख असणाऱ्या मातीचे माठ मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी दाखल झाले असून माठ खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पुरूष–महिला कबड्डी गट निवड चाचणी

हिंगोली– येथील हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणी दि .१५ मार्च २०२६ रविवार रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत येथे आयोजित असून बहिर्जी शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शेळके यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, याप्रसंगी असोसिएशनचे पदाधिकारी उप–स्थित राहतील. जिल्हा स्तरीय अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेतून संघ निवडीसाठी निवड समितीमध्ये मेहराजखान पठाण, गणपत नरवाडे व डॉ. शिवशंकर कापसे यांचे नियुक्ती असोसिएशनच्या वतीने करण्यात आलेली आहे. जिल्हा कबड्डी संघ निवड चाचणीसाठी महत्तम वजन पुरुष खेळाडूंसाठी ८५ कि.वजन व महिला खेळाडूंसाठी ७५ कि.वजनाची अट राहील.खेळाडुंनी सोबत आधारकार्ड आणणे आवश्यक आहे. जिल्हास्तरीय निवड चाचणीतून निवड झालेला संघ सिन्नर जिल्हा नाशिक येथे होणाऱ्या ७१ व्या पुरुष व महिला महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत दि.२५ ते २९ मार्च २०२६ दरम्यान हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पुरुष व महिला कबड्डी संघ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या निवड चाचणीसाठी जिल्ह्यातील सर्व क्रीडामंडळे, महाविद्यालयांच्या खेळाडू यांनी सहभागी व्हावे असे आवाहन हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष माजी खासदार ॲड शिवाजीराव माने, उपाध्यक्ष बंडु उर्फ केशव पाटील, सचिव डॉ. प्रा. नवनाथ लोखंडे, सहसचिव दिलीप बांगर, कोषाध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे, प्रा.एन. एस.बांगर, खंडबाराव नाईक, डॉ . शिवशंकर कापसे तसेच हिंगोली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सर्व सदस्य यांनी केले आहे.

### इशारा देताच आरोग्य केंद्रातील रिक्त जागा भरल्या



हिंगोली– हिंगोली तालुक्यातील आरोग्य केंद्र सिरसम अंतर्गत अस–लेले उपआरोग्य केंद्र लासिना येथे समुदाय आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून,सदर अधिकाऱ्यास कामकाज पाहण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे पत्र जिल्हा आरोग्यअधिकारी यांनी दिले असल्याने, १२ मार्च रोजी करण्यात येणारे उपोषण पवन जाधव पाटील यांनी मागे घेण्यात आले आहे. आरोग्य केंद्र सिरसम अंतर्गत असलेले उप आरोग्य केंद्र लासिना येथे समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,आरोग्य सेविका या रिक्त जागा तात्काळ भरण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सहा मार्च रोजी निवेदन देऊन,बेमुदत उपोषणचा इशारा देण्यात आला होता. सदर निवेदनाची प्रशासनाने दखल घेत, उप आरोग्य केंद्र लासिना येथे समुदाय आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर अधिकाऱ्यास कामकाज पाहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आरोग्य सेवक व आरोग्य सेविका या पदाच्या बाबतीत लवकरच नियुक्ती करण्यात येणार असल्याचे पत्र पवन जाधव पाटील यांना जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यावतीने देण्यात आले.

### १०० वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०० वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत १ लाख १९ हजार १५० रूपयांचा दंड वसूल केला.

# शिरड शहापूर येथील जलजीवन मिशनअंर्गत कामाची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १० मार्च**



तालुक्यातील मौजे शिरड शहापूर येथे 'जल जीवन मिशन' अंतर्गत करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आर–ोप करीत या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी सरपंच जितू रावले यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

तक्रारीत शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'जल जीवन मिशन' योजनेअंतर्गत गावात पाणीपुरवठ्याचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, हे काम करत असताना अनेक नियम धाब्यावर बसवण्यात आले आहेत. गावात टाकण्यात आलेली पाईपलाईन अत्यंत निकृष्ट दर्जाची असून काम करताना तांत्रिक नियमांचे पालन केलेले नाही. काम अर्धवट, बिले पूर्ण: प्रत्यक्ष जमिनीवर काम अजूनही अर्धवट स्थितीत असताना, कागदोपत्री काम पूर्ण झाल्याचे दाखवून ठेकेदाराने संपूर्ण बिले उचलली असल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. पाईपलाईन टाकताना आणि इतर तांत्रिक बाबींमध्ये मोठ्या त्रुटी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याच प्रकरणात मारोती मोगले यांनी प्रशासनाकडे वरिष्ठ स्तरावरून एक स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त करावी.प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन स्पॉट इन्स्पेक्शन करावे. कामाचे मोजमाप आणि प्रत्यक्ष झालेले काम यांची पडताळणी करावी.या भ्रष्टाचारामध्ये सामील असलेले संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी हिंगोली आणि विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# सावित्रीबाई फुलेंना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

पहिल्या महिला शिक्षिका, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या स्मृतिदिना निमित्त वसमत येथे मंगळवारी (ता.१०) अभिवादन करण्यात आले. नशामुक्त भारत अभियान अंतर्गत, नशामुक्त भारत अभियान समिती, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या विद्यमाने अभिवादन उपक्रम येथील गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात पार पडला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, राम जाधव, सुभाष कुंभारकर, ज्ञानेश्वर वाकळे आदींची उप–स्थिती होती. प्रारंभी ज्ञानमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिम–ेला खादीचा सुत्रहार अर्पण करण्यात आले.

# काँग्रेसच्या संघर्ष पदयात्रेला हिंगोलीत अल्प प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर काँग्रेसच्यावतीने कळमनुरी ते हिंगोली संघर्ष पदयात्रा काढली परंतु या पदयात्रेला अल्प प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात राज्यात केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात तसेच शेतकरी प्रश्नांसह इतर प्रश्नांवर कळमनुरी ते हिंगोली संघर्ष पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला कळमनुरी येथून सुरूवात झाली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काढलेल्या या पदयात्रेला हिंगोलीत मात्र अल्प प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. पदयात्रेची काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली होती. जागोजागी पोस्टर्स, बॅनर्स लावण्यात आले होते. शहरातील गांधी चौकात काँग्रेसची संघर्ष पदयात्रा पोहोचल्यानंतर येथील जाहीर सभेला ४०० ते ५०० नागरिक उप–स्थित असल्याचे दिसत होते. त्यातही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा आणि कार्यकर्त्यांचा समावेश होता. यावरून काँग्रेसच्या पदयात्रेचा फज्जा उडाल्याचे दिसत होते.

# राज्यसभा खा. रामराव वडकुतेंचे जंगी स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मार्च**

नवनिर्वाचित राज्यसभा खासदार तथा हिंगोलीचे सुपुत्र आणि सर्वांचे मार्गदर्शक आदरणीय रामराव वडकुते यांचे हिंगोली शहरात आगमन झाले असता विविध ठिकाणी त्यांचे उत्स्फूर्त आणि जंगी स्व–ागत करण्यात आले.

रिसाला बाजार परिसरात समस्त रिस–ाला वासीयांच्यावतीने तसेच नगरसेवक कैलास शहाणे यांच्या पुढाकारातून भव्य स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी क्रेनच्या साहाय्याने भव्य पुष्पहार अर्पण करून, आतषबाजी व ढोल–ताशांच्या गजरात खासदार वडकुते यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रसंगी हिंगोलीचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे, भाजप जिल्हाध्यक्ष गजान–नराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच रिसाला बाजार भागातील प्रतिष्ठित नागरिकांमध्ये डॉ. अजय अग्रवाल, डॉ. नितीन साकळे, खके भाऊजी, राजेंद्र उर्फ चिनू सेठ अग्रवाल, हिंगोली पीपल्स बँकेचे शहराध्यक्ष राजेश अग्रवाल, राजू यादव, दीपक शेट्टी, सतीश दहिवाळ, नितीन डहाळे, इंद्रपाल बिसेन, गजानन उजा–डे, भैय्या उर्फ धीरज बायस, पवन यादव, भय्यू यादव, मनोज आप्पा होकारने, राकेश शहाणे, बबनराव सावके, संजय जाधव, विश्वास बांगर, दर्शित अग्रवाल, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, गोविंद शहाणे, बाळू गुरव, अरुण कहार, विकास दांडगे, दिलीप शहाणे, शिवा शिंदे, रणधीर बिसेन, नितीन शहाणे, दिव्यांश खर्जुले, संतोष जोजारे, सोमेश शहाणे, शुभम जोजारे, ऋषिकेश शहाणे, पवन उपाध्याय, योगेश होकर्ण यांच्यासह समस्त भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार रामराव वडकुते यांना भाजपकडून राज्यसभेवर प्रतिनिधीत्व मिळाल्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले. जिल्ह्याच्या विकासात भर पडणार असून कार्यकर्त्यांना मोठे पाठबळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे.